सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ३५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. २८ फेब्रुवारी २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## तिसऱ्या महायुद्धाची ठिणगी? अमेरिका-इस्त्रायलच्या हल्ल्यानंतर आक्रमक इराणचा ५ देशांवर हल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८तेहरान**

अमेरिका आणि इस्रायलने शनिवारी सकाळी इराणवर एकाचवेळी ३० ठिकाणी हल्ले करून युद्धाला सुरुवात केली आहे. आम्ही इराणला अण्वस्त्रधारी देश बनू देणार नाही अशी धमकी देत डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला थेट इशारा दिला आहे. अमेरिका आणि इस्रायलच्या या हल्ल्यानंतर इराणनेही आक्रमक भूमिका घेतली आहे. इराणने या हल्ल्याला प्रत्युत्तर देत तब्बल ५ देशांवर हल्ले केले आहे. इराणने इस्रायलवर मिसाइल हल्ले सुरू केलेत. त्याशिवाय इराणने आखाती देशांमधील कुवेत, बहरीन, अबु धाबी, कतार याठिकाणीही हल्ले केले आहे. त्यामुळे आखाती देशांनी आपल्या हवाई हद्द बंद केली आहे.



अमेरिकेकडून झालेल्या हल्ल्यानंतर इराणने बहरीनमधील अमेरिकेच्या तळांवर हल्ला केला आहे. तिथल्या नागरिकांच्या सुरक्षेसाठी सायरन वाजण्यास सुरुवात झाली आहे. अमेरिकेच्या जुफैर तळावर इराणकडून हल्ला करण्यात आला आहे. अमेरिका इस्रायल यांच्या हल्ल्यानंतर इराणने सौदी अरेबिया, कतार, बहरीन यासारख्या देशातील अमेरिकन तळांना टार्गेट केले आहे. त्यामुळे या हल्ल्यात ५ देशांना ओढण्याचा प्रयत्न इराणने केला आहे. अमेरिकेचा सगळ्यात मोठा लष्करी तळ बहरीनमध्ये आहे. त्याठिकाणी इराणने हल्ला केला आहे.

सौदी अरेबिया, कुवैत यासारख्या ठिकाणीही इराणने हल्ले चढवल्यामुळे जागतिक बाजारपेठेत तेल पुरवठा साखळी यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. तेल साठ्यावर याचा परिणाम झाल्यानंतर जगात तेल महागण्याचीही शक्यता आहे. अमेरिका इस्रायलने हल्ला केल्यास आम्हीही त्यांना जशास तसे उत्तर देऊ असा पवित्रा इराणने घेतला होता. त्यामुळेच अमेरिका आणि इराण यांच्या संघर्षात या देशांनी भूमिका घेणे टाळले होते. मात्र आता अमेरिका इस्रायल यांच्या हल्ल्यानंतर इराणने जोरदार प्रत्युत्तर देण्यास सुरुवात केली आहे.

दरम्यान, भारताने या देशातील भारतीय नागरिकांसाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. नुकतेच भारतीय पंतप्रधान इस्रायल दौऱ्यावर गेले होते. त्यानंतर काही दिवसांत हा हल्ला झाला आहे. त्यामुळे या हल्ल्यात भारताची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. इराणकडून ज्यारितीने हल्ले सुरू झाले ते पाहता जगातील इतर देशांनाही अमेरिका इस्रायलसोबतच्या युद्धात ओढण्याचा इराणचा प्रयत्न आहे. सौदी अरेबिया, कुवैत, बहरीन, कतार या देशांवरही इराणने हल्ले केले आहेत. त्यामुळे येत्या काळात जागतिक पातळीवर मोठी उलथापालथ होण्याची शक्यता आहे.

## बोलिव्हियामध्ये चलनाने भरलेले विमान कोसळले, १५ जणांचा मृत्यू:३० जखमी

### खराब हवामानामुळे धावपट्टीवरून घसरले विखुरलेल्या नोटा गोळा करण्यासाठी लोक जमले



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८लापाझ**

बोलिव्हियातील एल आल्टो शहरात शनिवारी सकाळी (भारतीय वेळेनुसार) वायुसेनेचे हरक्यूलिस विमान कोसळले. या अपघातात १५ लोकांचा मृत्यू झाला, तर ३० हून अधिक लोक जखमी झाले आहेत. हे विमान देशाच्या सेंट्रल बँकेच्या नवीन नोटा घेऊन जात होते.

रॉयटर्सच्या वृत्तानुसार, खराब हवामानामुळे विमान लँडिंगनंतर धावपट्टीवरून घसरून जवळच्या वर्दळीच्या रस्त्यावर कोसळले. ज्या रस्त्यावर ते कोसळले, तेथे उभ्या असलेल्या १० ते १५ गाड्याही त्याच्या तडाख्यात आल्या आणि त्यांचे नुकसान झाले. विमानाचा ढिगारा, तुटलेल्या गाड्या आणि मृतदेह रस्त्यावर विखुरलेले दिसले. रस्त्यावर बँकेच्या नोटाही विखुरलेल्या दिसल्या, ज्या गोळा करण्यासाठी लोक घटनास्थळी जमा झाले. या अपघातानंतर विमानतळ तात्पुरते बंद करण्यात आले आहे.

सोशल मीडियावर समोर आलेल्या व्हिडिओमध्ये अपघातानंतर गोंधळाचे वातावरण दिसले. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी स्थानिक अधिकाऱ्यांना पाण्याचा फवारा आणि अश्रुधुराचा वापर करावा लागला. तथापि, या व्हिडिओंची अधिकृत पुष्टी होऊ शकलेली नाही.

अपघातानंतर एल आल्टो आंतरराष्ट्रीय विमानतळ तात्पुरता बंद करण्यात आला. राष्ट्रीय विमान कंपनीने निवेदन जारी करून सांगितले की, अपघातग्रस्त विमान त्यांच्या ताफ्याचा भाग नव्हते, हे वायुसेनेचे विमान होते. स्थानिक माध्यमांमध्ये प्रसारित झालेल्या फुटेजमध्ये विमान मोठ्या प्रमाणात खराब झालेले दिसले. अपघातानंतर विमान दोन तुकड्यांमध्ये विभागले गेले.

बोलिव्हियाची मध्यवर्ती बँक आज या घटनेवर पत्रकार परिषद घेणार आहे. अपघाताच्या कारणांची अधिकृत चौकशी सुरू करण्यात आली आहे. जखमींवर स्थानिक रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत. प्रशासनाने मृतांची ओळख पटवणे आणि नुकसानीचे मूल्यांकन करणे सुरू केले आहे.

## गरज पडल्यास जागतिक संस्थांची मदत घ्या, सुनेत्रा पवारांच्या नेतृत्वात आम्हीच सीबीआय चौकशीची मागणी केली- तटकरे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या चौकशीबाबत पक्षाची भूमिका स्पष्ट केली आहे. अजितदादांच्या अपघाताबाबत जनसामान्यांच्या मनात असलेल्या सर्व शंकांचे निरसन झाले पाहिजे. गरज पडल्यास या तपासासाठी जागतिक स्तरावरील निष्णात संस्थांची मदत घ्यावी, पण सत्य लवकरात लवकर समोर आले पाहिजे, अशी मागणी तटकरे यांनी केली आहे.



सुनील तटकरे म्हणाले की, विमान अपघाताचा तपास करताना कोणत्याही प्रकारची त्रुटी राहता कामा नये. आजवर या प्रकरणावर जे प्रश्न उपस्थित केले गेले आहेत, त्या सर्व बाबींचा सखोल तपास व्हावा. भारत सरकारच्या स्वायत्त संस्था आणि केंद्रीय नागरी उड्डाण मंत्रालयामार्फत चौकशी सुरू आहेच, शिवाय मुख्यमंत्र्यांनी यापूर्वीच सीआयडी चौकशीचे आदेश दिले आहेत.

**सुनेत्रा वहिनींच्या नेतृत्वाखाली सीबीआय चौकशीची मागणी**

तपासाच्या प्रक्रियेवर बोलताना त्यांनी सांगितले की, आम्ही केवळ मागणी करून थांबलो नाही, तर राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या प्रकरणाचा तपास सीबीआय (उइख) कडे सोपवण्याची विनंती केली होती. मुख्यमंत्र्यांनीही तत्परता दाखवत केंद्रीय गृहमंत्रालयाकडे ही मागणी वर्ग केली असून, त्यानुसार आता सीबीआय तपास सुरू झाला आहे.

**टीकाकारांना सुनावले**

अजित पवारांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांना संधी देण्यावरून होणाऱ्या टीकेलाही त्यांनी उत्तर दिले. अजितदादांचा एकनिष्ठ सहकारी म्हणून सुनेत्रा वहिनींना संधी मिळावी, ही आमची ठाम भूमिका होती. ज्यांना टीका करायची आहे त्यांनी ती खुशाल करावी, पण आम्ही आमचे प्रामाणिक कर्तव्य पार पाडले आहे, अशा शब्दांत त्यांनी विरोधकांना सुनावले.

## विदर्भाच्या 'काळ्या सोन्या'त उगवली चक्क 'रत्ने'

### ५०० नमुन्यांतून उलगडणार पृथ्वीचा गुप्त खजिना



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९नागपूर**

विदर्भातील वेस्टर्न कोल्ड फिल्ड्स (डब्ल्यूसीएल) च्या खाणींमध्ये जणू पृथ्वीने स्वतःचा गुप्त खजिनाच उघडला आहे. कोळशाच्या काळ्या थरांआड लाखो वर्षे लपून बसलेले दुर्मीळ आणि धोरणात्मक धातू आता विदर्भाच्या भवितव्याला हिरेजडित तेज देण्यासाठी समोर येत आहेत. इथे सापडलेले रेनिअम, टायटॅनियम, पोटॅश आणि टेल्युरियम यांसारखे मौल्यवान धातू भविष्यात देशाच्या संरक्षण, अवकाश, शेती आणि हरित ऊर्जा क्षेत्रासाठी 'गेमचेंजर' ठरणार आहेत, यामुळे 'डब्ल्यूसीएल'चे महत्त्व आता जागतिक नकाशावर वाढणार आहे.

केंद्र सरकारच्या 'क्रिटिकल मिनरल्स' उपक्रमांतर्गत विविध कोलफिल्ड्समध्ये दुर्मीळ घटकांच्या शोधाला सध्या वेग आला आहे. 'डब्ल्यूसीएल'ने आपल्या विविध क्षेत्रांतील ६ उघड्या खाणींमधून सुमारे ५०० नमुने गोळा केले होते. या नमुन्यांचे 'एलिमेंटल अनालिसिस' (घटक विश्लेषण) केले असता, त्यात या मौल्यवान धातूंचे अस्तित्व आढळून आले. पुढील सखोल चाचण्यांसाठी नागपूर जिल्ह्यातील अदासा (युजी ते ओसी) आणि मकरधोकडा-श्री खाणींचे नमुने हैदराबाद येथील प्रगत प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले आहेत. प्रमाण, शुद्धता आणि आर्थिकदृष्ट्या उत्खननाची व्यवहार्यता निश्चित झाल्यानंतर कंपनी व्यावसायिक उत्खनन व मार्केटिंगचा आराखडा आखणार आहे.

यानंतर कोळसा-केंद्रित कंपनीपासून 'मल्टी-मिनरल' महामंडळाकडे वाटचाल हा पुढील टप्पा असेल. नंतर दुर्मीळ धातूंच्या उत्खननासाठी तांत्रिक भागीदारी, प्रक्रिया-उद्योग आणि जागतिक बाजारपेठेतील नेटवर्किंगवर भर दिला जाईल. यामुळे विदर्भात पूरक उद्योग उभे राहून रोजगारनिर्मितीला चालना मिळू शकेल, अशी माहिती उच्चस्तरीय अधिकाऱ्यांनी दिली.

## अजित पवारांच्या विमान अपघातावर पतंगबाजी नको

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८मुंबई**

अजित पवार यांच्या विमान अपघातात झालेल्या मृत्यूवर कुणीही पतंगबाजी करू नये, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केले. अशा घटना घडतात तेव्हा आपण कोणतीही पतंगबाजी किंवा हवेत गोळीबार करण्याचा प्रयत्न करू नये. हा अत्यंत संवेदनशील मुद्दा असतो. या प्रकरणी आपण मृत व्यक्तीच्या पद व प्रतिष्ठेचा तथा त्याच्या कुटुंबीयांच्या प्रतिष्ठेचाही विचार करायला हवा, असे ते म्हणालेत.



अजित पवार यांचे गत २८ जानेवारी रोजी बारामती येथे झालेल्या एका विमान अपघातात निधन झाले. तेव्हापासून सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस व विरोधी बाकावरील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या आमदार हा अपघात नसून, घातपात असल्याचा आरोप करत आहेत. विशेषतः शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी या दुर्घटनेविषयी काही महत्त्वपूर्ण खुलासे व पुरावे सादर करून या प्रकरणात घातपाताचा संशय असल्याचा ठाम दावा केला आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात बोलताना उपरोक्त आवाहन केले आहे.

**पतंगबाजी किंवा हवेत गोळीबार नको**


मुख्यमंत्री म्हणाले, आमदार रोहित पवार यांनी माझी भेट घेऊन काही मुद्दे मांडले. त्यांनी दिलेल्या पत्राला मी माझे पत्र जोडून डीजीसीएकडे या घटनेची सखोल चौकशी करण्याची मागणी करणार आहे. पण अशा घटना घडतात तेव्हा आपण कोणतीही पतंगबाजी करू नये. कारण, हा अत्यंत संवेदनशील मुद्दा असतो. दुर्दैवाने जी व्यक्ती मृत आहे, त्या व्यक्तीच्या पद व प्रतिष्ठाचा आपण विचार केला पाहिजे. विशेषतः त्याच्या कुटुंबीयांच्या प्रतिष्ठेचाही या प्रकरणी विचार झाला पाहिजे. त्यामुळे या प्रकरणी कोणतीही पतंगबाजी किंवा हवेत गोळीबार करू नये असे मला वाटते. या प्रश्नावर याहून अधिक मी बोलू इच्छित नाही.

## ज्वलनशील पदार्थांच्या वाहतुकीसाठी SOP च नाही

### मुख्यमंत्र्यांची कबुली; मुंबई - पुणे महामार्गावरील दुर्घटनेवर विधानसभेत चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८मुंबई**

चालू महिन्याच्या सुरुवातीला मुंबई - पुणे एक्सप्रेसवर प्रोपेलिन वायूचा टँकर उलटल्याने संपूर्ण महामार्ग ठप्प झाला होता. यामुळे तब्बल ३२ तास ट्रॅफिक जाम होऊन वाहनचालकांचे प्रचंड हाल झाले होते. आज राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातही हा मुद्दा गाजला. त्यात मुख्यमंत्र्यांनी अशा स्थितीला सामोरे जाण्यासाठी संबंधित इंधन कंपन्या व सरकारकडे कोणतीही एसओपी नसल्याची कबुली दिली. तसेच या प्रकरणी लवकरच ठोस पाऊले उचलण्याची ग्वाहीही दिली.




भाजपचे मुंबई अध्यक्ष आमदार अमित साटम यांनी ज्वलनशील पदार्थांच्या वाहतुकीसाठी काही विशिष्ट नियम आहेत का? असा प्रश्न लक्षवेधी सूचनेद्वारे विधानसभेत मांडला. मुंबई- पुणे महामार्गावर ज्वलनशील पदार्थाची वाहतूक करणारा एक टँकर उलटल्यामुळे वाहनचालकांसह प्रशासनाची मोठी पंचाईत झाली, असे ते म्हणाले. त्यावर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी उत्तर दिले. ते म्हणाले, ३ फेब्रवारी रोजी सायंकाळी ५ च्या सुमारास मुंबई - पुणे द्रुतगती महामार्गावर मुंबईकडे जाणाऱ्या एका लेनवर प्रोपेलिन गॅसची वाहतूक करणाऱ्या एका टँकरचा अपघात झाला होता.

सदर अपघातात टँकरमधील ज्वलनशील वायूची गळती सुरू झाली होती. सदर घटनेमुळे वाहतूक काही तास बंद ठेवून मुंबईकडे जाणारी वाहतूक लोणावळा व खोपोली मार्गावर वळवण्यात आली होती. अमित साटम यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने या टँकरची तपासणी करण्यात आली होती. त्याचा योग्य तो परवानाही घेतला होता. त्याची वारंवार तपासणी होत होती. परंतु, मुंबई - पुणे एक्सप्रेसवर एकेठिकाणी वाहन चालकाचा तोल जाऊन टँकर उलटला. पण या प्रकरणी आपल्या अधिकारी व वाहतूक पोलिसांचे कौतुक केले पाहिजे.

## मेळघाटातील सुविधा, सुरक्षेवर भर देणार : गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

जिल्ह्यातील धारणी आणि चिखलदरा या दुर्गम भागांच्या विकासासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे. या भागाच्या समस्या जाणून परिसराचा कायापालट करण्यात येणार आहे. प्रामुख्याने मेळघाटातील सुविधा, सुरक्षेवर भर देणार आहे, असे गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी सांगितले.आज डॉ. भोयर यांनी धारणी येथील पोलीस स्टेशनला भेट देऊन पोलीस ठाण्याच्या कामकाजाचा आढावा घेतला, तसेच विविध उपक्रमांची पाहणी केली. यावेळी आमदार केवलराम काळे,



प्रभुदास भिलावेकर, नगराध्यक्ष सुनील चौथमल, जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद, सहाय्यक जिल्हाधिकारी तसेच प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ शुक्ला, उपविभागीय पोलीस अधिकारी महादेव गरुड, तहसीलदार प्रदीप शेवाळे, पोलीस निरीक्षक अवतारसिंग चव्हाण, सहाय्यक पोलीस निरीक्षक संध्या चव्हाण, गटविकास अधिकारी विजय गायकवाड, गटशिक्षणाधिकारी वैभव लादे आदी उपस्थित होते.डॉ. भोयर यांनी, बऱ्याच वर्षांनंतर या आदिवासी बहुल भागाचा दौरा करण्याची संधी मिळाली आहे. तसेच या भागातील कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती पाहण्यासाठी धारणी पोलीस स्टेशनला भेट देण्यात आल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी पोलीस प्रशासनाच्या कामकाजाचा आढावा घेतला आणि स्थानिक नागरिकांच्या समस्या तसेच त्यांच्या अपेक्षा जाणून घेतल्या.स्थानिक आमदार आणि लोकप्रतिनिधी यांच्या पुढाकाराने विद्यार्थ्यांसाठी नवीन अभ्यासिका इमारत बांधण्यात आली आहे. या शैक्षणिक सुविधेबद्दल स्थानिक लोकप्रतिनिधींचे कौतुक करण्यात आले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी उपयुक्त ठरणारे पुस्तके वाटप केली. दुर्गम भागातील नागरिकांना आवश्यक असणाऱ्या पायाभूत सोयी-सुविधा पुरवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येणार आहे. मेळघाटचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली योजना राबविण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.यावेळी डॉ. भोयर यांनी धारणी पोलीस स्टेशन येथील पाणपोईचे लोकार्पण केले. तसेच गुन्हे तपास प्रक्रियेला गती देण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या फॉरेन्सिक वाहनाचे उद्घाटन केले.

## संपादकीय ......

# मराठवाड्याचा पाणी प्रश्न

*मराठवाड्यातील पाणी प्रश्नाचा उगम चुकीचे जल नियोजन, असमतोल वाटप आणि रखडलेल्या सिंचन प्रकल्पांत दडले आहे. जायकवाडीसह जलव्यवस्थेतील तफावत, वाढता अनुशेष याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.*

*मराठवाड्याचा पाणी प्रश्न हा निसर्गनिर्मित नसून तो नियोजनातील विसंगती, अन्यायकारक वाटप आणि प्रशासकीय अपयशातून निर्माण झालेला आहे, हे उपलब्ध आकडेवारी स्पष्टपणे दाखवते. जून २०१७ मध्ये तयार केलेल्या गोदावरी नदीच्या एकात्मिक जलविकास आराखड्यानुसार मार्च २०१६ पर्यंत मराठवाड्यात आठ मोठे, सहा मध्यम आणि चाळीस लघू असे एकूण ५४ राज्यस्तरीय सिंचन प्रकल्प बांधकामाधीन होते. या प्रकल्पांची अद्ययावत किंमत मार्च २०१६ अखेर २१ हजार ७१७ कोटी रुपये इतकी होती, तर एप्रिल २०१६ नुसार हे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आणखी ११ हजार ८८ कोटी रुपयांची आवश्यकता होती. मोठे प्रकल्प सरासरी ३७ वर्षे, तर मध्यम प्रकल्प सरासरी २६ वर्षे रखडलेले असल्याचे याच आराखड्यात नमूद आहे. लघू प्रकल्पांचा तपशील दिलेला नसला, तरी दशकानुदशके रखडलेले मोठे आणि मध्यम प्रकल्प हे मराठवाड्याच्या सिंचन अपयशाचे मुख्य कारण ठरले आहेत.*

*मराठवाड्याच्या पाणी प्रश्नाचा केंद्रबिंदू असलेला जायकवाडी प्रकल्प हा जलनियोजनातील विसंगतीचे ज्वलंत उदाहरण आहे. जायकवाडीचे लाभक्षेत्र निम्न गोदावरी खोर्यात असताना त्याचे पाणलोट क्षेत्र मात्र उर्ध्व गोदावरी खोर्यात आहे. मूळ नियोजनानुसार उर्ध्व गोदावरी खोर्यातून जायकवाडीपर्यंत १९६ टीएमसी पाण्याची उपलब्धता गृहित धरली होती. यापैकी नाशिक व नगर जिल्ह्यातील धरणांसाठी ११५ टीएमसी पाणी नियोजित होते. जायकवाडीचा ७५ टक्के विश्वासार्ह येवा ९४.४ टीएमसी, संकल्पित उपयुक्त साठा ७७ टीएमसी, निभावणीचा साठा १३ टीएमसी आणि जायकवाडीतून माजलगाव प्रकल्पात सोडायचे पाणी १२.४ टीएमसी इतके ठरविले होते. विशेष म्हणजे, या मूळ नियोजनात पिण्याच्या, घरगुती आणि औद्योगिक वापरासाठी कोणतीही तरतूद नव्हती, तसेच जलाशयावरून उपसा सिंचनाचीही तरतूद केलेली नव्हती. प्रवाही सिंचनासाठी ४९ टीएमसी पाणी उपलब्ध होईल, असा आराखडा होता; मात्र आजचे वास्तव पूर्णपणे वेगळे आहे. शासनानेच आता मान्य केले आहे की, उर्ध्व गोदावरी खोर्यातून जायकवाडीपर्यंत प्रत्यक्ष उपलब्धता १९६ टीएमसी नसून केवळ १५६ टीएमसी इतकीच आहे. नाशिक व नगर भागात मूळ नियोजनापेक्षा जास्त क्षमतेची धरणे बांधली गेली असून त्यांची प्रत्यक्ष साठवण क्षमता सुमारे १५० टीएमसी, म्हणजेच नियोजनापेक्षा ३५ टीएमसी अधिक आहे. त्याहून गंभीर बाब म्हणजे खरीप हंगामात या धरणांतील पाणी कालव्यांद्वारे मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीररीत्या फिरवले जाते. त्यामुळे धरणांची पातळी खाली जाते; मात्र त्या भागात पाऊसमान चांगले असल्याने धरणे पुन्हा भरतात.*

*या सर्वांचा एकत्रित परिणाम असा झाला आहे की, सामान्य पर्जन्यमानाच्या वर्षातही जायकवाडीला प्रत्यक्षात केवळ २८.२२ टीएमसी म्हणजे सुमारे ३० टक्केच पाणी मिळते. हा प्रकार असाच सुरू राहिला, तर जायकवाडी भविष्यात कधीही पूर्ण भरणार नाही, असे अधिकारीच सांगत आहेत. विज्ञान व तंत्रज्ञान बदलले, असे कारण पुढे केले जाते; मात्र हा बदल फक्त जायकवाडीपुरताच का झाला, हा प्रश्न अनुत्तरित आहे. एकूण तूट सुमारे ४० टीएमसीची आहे, तर ही संपूर्ण तूट जायकवाडीवरच का टाकली जाते आणि उर्ध्व गोदावरीतील सर्व प्रकल्पांमध्ये तुटीचे समन्यायी वाटप का केले जात नाही?बिगर सिंचन वापराच्या बाबतीतही विसंगती स्पष्ट दिसते. २०१८ च्या फेरनियोजनात घरगुती वापरासाठी ११८ द.ल.घ.मी. आणि औद्योगिक वापरासाठी ७६ द.ल.घ.मी. पाणी दाखविले; मात्र मेंढेगिरी समितीच्या अहवालात आणि गोदावरी अभ्यास गटाच्या २०१३ च्या अहवालात घरगुती वापर २८३ द.ल.घ.मी. आणि औद्योगिक वापर १६१ द.ल.घ.मी. असल्याचे नमूद आहे. समांतर पाणीपुरवठा योजना, स्मार्ट सिटी आणि डीएमआयसीसाठी आरक्षित पाण्याचा फेरनियोजन २०१८ मध्ये कोणताही स्पष्ट उल्लेख नसणे ही गंभीर धोरणात्मक त्रुटी आहे. २९ नोव्हेबर २०१२ रोजी प्रसिद्ध सिंचन अनुशेष निर्मूलन व सिंचन घोटाळ्यासंदर्भातील श्वेतपत्रिकेत जाहीर केले होते की, गोदावरी खोर्याअंतर्गत मराठवाडा भागातील नवीन प्रकल्पांसाठी पाणी उपलब्ध नाही. २००२-०३ ते २०११-१२ या दहा वर्षांत राज्यात वैधानिक विकास मंडळावर एकूण ४६ हजार ९६५ कोटी रुपयांचा खर्च केला. पैकी मराठवाड्यावर सुमारे २० टक्के म्हणजे ९ हजार ४५३ कोटी रुपये खर्च झाले. यामुळे मराठवाड्याचा भौतिक अनुशेष १०० टक्के दूर झाल्याचा दावा करण्यात आला; मात्र महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या २०१७-१८ च्या वार्षिक अहवालात भौतिक आणि आर्थिक अनुशेष वेगवेगळ्या आधारांवर मोजले जात आहे.*

# एका तासात एक क्विंटल सोयाबीनची सफाई व प्रतवारी करणारे फिरते यंत्र विकसित

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक**
सध्या सोयाबीनकाढणीचा हंगाम सुरू आहे. भारतासह महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर घेतले जाणारे सोयाबीन हे शेतकऱ्यांसाठी आर्थिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे पीक आहे.




मात्र काढणीदरम्यान अनेकदा काही प्रमाणात सोयाबीनचे दाणे शेतात सांडतात आणि ते माती, दगड, पेंढा, पाने, गवत यांसोबत मिसळतात. विशेषतः विदर्भ प्रदेशात शेतकरी हे सांडलेले धान्य हाताने किंवा झाडूच्या सहाय्याने गोळा करतात.

कृषी विशेष

यानंतर पारंपारिक हातचाळणी पद्धतीने त्याची स्वच्छता आणि दर्जानुसार वर्गवारी केली जाते. ही प्रक्रिया अत्यंत श्रमप्रधान, वेळखाऊ असून दर्जाच्या एकसंधतेस बाधक ठरते. परिणामी सोयाबीनचा अपव्यय वाढतो आणि बाजारात योग्य भाव मिळत नाही.

सध्या बाजारात अशा प्रकारची फिरती (मोबाईल) सफाई व प्रतवारी यंत्रे उपलब्ध नाहीत, ज्यांच्या माध्यमातून थेट शेतपातळीवर हे काम प्रभावीपणे करता येऊ शकते.

सध्या उपलब्ध बरीच यंत्रे स्थिर प्रकारची असून त्यांचा वापर मोठ्या प्रमाणात धान्य हाताळण्याच्या ठिकाणीच केला जातो. त्यामुळे लघु, सीमांत शेतकऱ्यांना हलकी, स्थानांतरयोग्य यंत्रे उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या उत्पादनाची गुणवत्ता कमी होते आणि काढणीनंतरचा तोटा वाढतो.

या समस्येची गांभीर्याने दखल घेऊन झऊघत -ज्ञेश्रर डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील कापणी पथात अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विभागात एक अत्यंत उपयुक्त, किफायतशीर आणि कार्यक्षम यंत्र विकसित करण्यात आले आहे.

'पं.दे.कृ.वि. मोबाईल सफाई ग्रेडिंग यंत्र' हे यंत्र विशेषतः लघु शेतकऱ्यांच्या गरजा लक्षात घेऊन तयार केले गेले आहे व गावपातळीवर सोयाबीनची प्राथमिक स्वच्छता व प्रतवारी करण्यास सक्षम आहे.

लहान शेतकऱ्यांसाठी फायदेशीर

हे यंत्र लहान शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. त्यांच्या शेताची मर्यादित क्षेत्रफळे व तुलनेने कमी उत्पादन लक्षात घेता, जमिनीवर पडून वाया जाणारे 'मातेरा सोयाबीन' हे त्यांच्या आर्थिक नुकसानीचे मुख्य कारण ठरते.

हे दाणे ते मजूर लावून गोळा करतात, ज्यासाठी खूप वेळ व पैसा खर्च होतो. अशा वेळी हे यंत्र शेतकऱ्यांसाठी मोठे सहाय्यक ठरते. या यंत्राच्या मदतीने मातीमिश्रित सोयाबीन खूपच कमी वेळात स्वच्छ करता येते. शेतकऱ्यांचे उत्पादन वाढते.

यंत्राच्या वापरामुळे मिळणारे फायदे

शेतातील मातेरा सोयाबीन सहज, जलद व कार्यक्षमतेने स्वच्छ करता येते.

इतर शेतकऱ्यांच्या सोयाबीनवरही भाडेतत्त्वावर प्रक्रिया करून अतिरिक्त उत्पन्न मिळविता येते.

गुणवत्तावाढ झाल्यामुळे बाजारभाव चांगला मिळतो.

लघु शेतकरी व उत्पादक समूहांसाठी उत्तम साधन.

यंत्राची प्रमुख वैशिष्ट्ये

क्षमता : ९० ते १०० कि.ग्रॅ./तास (सोयाबीनसाठी)

ऊर्जास्रोत : ०.५ एच.पी. सिंगल फेज वीज मोटर

उत्पादन गुणोत्तर

सफाई कार्यक्षमता - सुमारे ९६%

प्रतवारी कार्यक्षमता - सुमारे ९५%

कार्यपद्धती

सोयाबीन हॉपरमधून टाकल्यावर ते कंपन करणाऱ्या चाळणी विभागाकडे जाते. यामध्ये तीन वेगवेगळ्या आकारांच्या चाळण्या असतात.

१) पहिली चाळणी - मोठा कचरा (मातीच्या गाठी, झाड, पेंढा इ.)

२) दुसरी चाळणी - शुद्ध, मध्यम आकाराचे दाणे.

३) तिसरी चाळणी - लहान दाणे

ब्लोअरद्वारे पेंढा, पाने, हलकी अपघटक सामग्री वेगळी होते. यंत्र लहान व पोर्टेबल असल्यामुळे एकाच व्यक्तीकडून चालवणे शक्य.

व्यवसाय संधी

सोयाबीन व्यतिरिक्त इतर कडधान्ये, धान्ये यासाठीही वापर शक्य.

गावपातळीवर प्रक्रिया करून विक्री करता येते.

ग्रामीण युवक व महिलांसाठी स्वयंरोजगार संधी.

प्रशिक्षण व संपर्क

या यंत्राच्या वापर, देखभाल, कार्यपद्धती, विपणन व व्यवसाय नियोजनासाठी प्रशिक्षण सुविधा उपलब्ध आहेत.

इच्छुकांनी कुठे संपर्क साधावा?

संशोधन अभियंता, कापणी पश्चात अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विभाग

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला ४४४१०४

दूरध्वनी : ०७२४-२२५८२६६

- डॉ. प्रमोद बकाने, श्री. राजन बिसेन, डॉ. सुरेश काळबांडे, श्री. उदयकुमार खोब्रागडे

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला.

# मुलांचे दंतारोग्य आणि टूथपेस्टची निवड



**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक**
घरात जेव्हा एकच टूथपेस्ट असते, तेव्हा अनेक पालकांच्या मनात प्रश्न येतो की, मुलेही तीच टूथपेस्ट वापरू शकतात का? मुलांचे दात अतिशय नाजूक असतात. त्यामुळे त्यांच्या स्वच्छतेबाबत थोडाही




निष्काळजीपणा भविष्यात मोठी समस्या निर्माण करू शकतो.

मुले मोठ्यांचे नॉर्मल एडल्ट टूथपेस्ट वापरू शकतात. टूथपेस्टमधील फ्लोराईडचे प्रमाण. फ्लोराईड दातांना मजबूत बनवते आणि कॅव्हिटीपासून (दातांची कीड) संरक्षण करते. लहान मुलांसाठी 'फ्लोराईड'चे प्रमाण १००० पीपीएमपेक्षा कमी असावे. फ्लोराईड नसलेले टूथपेस्ट मुलांसाठी योग्य मानले जात नाही, कारण त्यामुळे दात सडण्याचा धोका वाढतो. वयोगटानुसार टूथपेस्टचे प्रमाण कसे असावे, हेही लक्षात घ्यायला हवे.

सहा महिने ते तीन वर्षे वयोगटातील मुलांसाठी टूथपेस्ट'ची मात्रा केवळ तांदळाच्या दाण्या इतकीच असावी. या वयातील मुलांना थुंकणे जमत नाही, त्यामुळे जास्त टूथपेस्ट देणे टाळावे. ही कमी मात्रा दातांच्या स्वच्छतेसाठी पुरेशी आणि मुलांसाठी सुरक्षित असते. तीन ते सहा वर्षे वयोगटातील मुले थोड्या चांगल्या प्रकारे ब्रश करायला शिकतात. या वयात मटारच्या दाण्या इतकी टूथपेस्ट देणे योग्य ठरते. या मुलांसाठी १००० ते १५०० पीपीएम पर्यंत फ्लोराईड असलेले टूथपेस्ट वापरता येते.


सहा वर्षांनंतर मुले व्यवस्थित गुळण्या करायला आणि थुंकायला शिकतात. त्यामुळे सहा ते बारा वर्षे वयोगटातील मुले मोठ्यांचे टूथपेस्ट सामान्य प्रमाणात वापरू शकतात. या वयात मुले टूथपेस्ट गिळण्याऐवजी बाहेर थुंकत असल्याने धोका राहत नाही. पालकांनी फक्त एकच गोष्ट लक्षात ठेवावी की, टूथपेस्टमध्ये फ्लोराईड असणे आवश्यक आहे. फ्लोराईड हे दातांसाठी एक प्रकारचे सुरक्षा कवच असून ते कीड आणि सडण्यापासून दातांचे रक्षण करते. त्यामुळे मुलांसाठी टूथपेस्ट निवडताना नेहमी त्यातील फ्लोराईडचे प्रमाण तपासून घ्यावे.

थोडक्यात सांगायचे तर, टूथपेस्ट घेताना त्यातील फ्लोराईड'ची मात्रा तपासणे सर्वात महत्त्वाचे आहे. फ्लोराईड हे दातांसाठी एक प्रकारचे सुरक्षा कवच म्हणून काम करते. योग्य प्रमाणात याचा वापर केल्यास मुलांचे दात निरोगी आणि मजबूत राहतात.

# मेळघाटात दुर्मिळ वन्यजीव सहजीवनाची नोंद

## लांडगा व रानकुत्र्यांमध्ये मैत्री

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८मेळघाट**



मेळघाट व्याघ्र प्रकल्पात एक अत्यंत दुर्मिळ आणि अभ्यासकांना आश्चर्यचकित करणारी घटना नोंदवण्यात आली आहे. भारतीय राखाडी लांडगा आणि आशियाई रानकुत्रे (ढोल) या दोन भिन्न प्रजातींमध्ये मैत्रीपूर्ण सहवास आढळून आला असून, विशेष म्हणजे या कळपाचे नेतृत्व एका प्रौढ लांडग्याकडे असल्याचे आढळून आले. व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रात ज्येष्ठ वन्यजीव अभ्यासक आणि अमरावती जिल्ह्याचे मानद वन्यजीव रक्षक डॉ. सावन देशमुख यांना भारतीय लांडगा आणि चार रानकुत्रे (ढोल) एकत्र फिरताना आढळून आले.

या दोन्ही प्रजातींमध्ये सहसा परस्पर सहवास टाळण्याकडेच भर असतो. मात्र मेळघाटातील या ताज्या निरीक्षणात कोणतीही आक्रमकता, गुरगुरणे किंवा झेप घेण्यासारखे वर्तन दिसले नाही. उलट, डॉ. सावन देशमुख यांनी सुमारे ४० मिनिटे हा गट एकत्रितपणे शांतपणे हालचाल करत असल्याचे अतिशय महत्वपूर्ण निरीक्षण नोंदवले. यातील सर्वात विशेष बाब म्हणजे म्हणजे लांडगा अग्रभागी राहून कळपाच्या हालचालीचे नेतृत्व करत असल्याचे स्पष्ट दिसले. मेळघाटातील ही घटना वन्यजीव संवर्धन आणि आंतरप्रजाती वर्तन अभ्यासासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जात आहे. डॉ. देशमुख या विषयातील तज्ज्ञ अभ्यासकांच्या संपर्कात असून या अतिशय दुर्मिळ नोंदीची अधिक चिकित्सा आणि संशोधन करीत आहे. तसेच या संबंधी लवकरच वैज्ञानिक नियतकालिकात ते शोध निबंध प्रकाशित करणार आहे.

# पाकिस्तानात प्रचंड गोंधळ!

## पेशावरपासून काबूलपर्यंत स्फोटांचे आवाज; ५५ सैनिक ठार केल्याचा दावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ कराची** : गेल्या दोन दिवसांपासून पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यात सुरु असलेल्या लष्करी तणावाने आता हळूहळू युद्धाचे रूप प्राप्त केले आहे. दिवसभरात पाकिस्तानकडून अफगाणिस्तावर एअरस्ट्राईक करण्यात आल्यानंतर, रात्री उशिरा अफगाणिस्तानने पाकिस्तानवर मोठा हल्ला केला आहे. त्यांनी ५५ पाकिस्तानी सैनिकांना ठार मारल्याचा दावा केला आहे. अफगाण सरकारने २३ पाकिस्तानी सैनिकांचे मृतदेह आपल्याकडे असल्याचेही म्हटले आहे. डुरंड सीमेवरून सुरू असलेल्या संघर्षात अफगाण सैन्याने पाकिस्तानी सैन्याचे मुख्यालय आणि १९ चौक्यादेखील ताब्यात घेतल्या आहेत.



पाकिस्तानी हवाई हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून, तालिबानी सैन्याने सीमेवरील पाकिस्तानी लष्करी स्थानांवर हल्ला केला. लष्करी सैनिकांनी पाकिस्तानी सीमेत घुसून जलद हल्ले केले. अफगाणिस्तानचे लष्करप्रमुख फसिहुद्दीन फितरत यांनी आघाडीवर पोहोचून सैन्याच्या कारवायांचा आढावा घेतला. तालिबानी सैन्याने पाकिस्तानी लष्करी चौक्यांवरून मोठ्या प्रमाणात शस्त्रे हस्तगत केली. त्यांनी पाकिस्तानी लष्करी चौक्यांवर भयंकर हल्ला केला, ज्यामुळे त्यांच्या सैनिकांना पळून जावे लागले. अफगाण सैनिकांनी पाकिस्तानी चौक्या आणि वाहनांना आग लावली आणि नष्ट केले. शिवाय, अफगाणिस्तानने पाकिस्तानातील पेशावरमध्ये ड्रोन हल्ला केला, ज्यामुळे बाजारपेठेत घबराट पसरली.

या हल्ल्यात अनेक जण ठार झाल्याचे वृत्त आहे. इस्लामाबादमधील पाकिस्तानी लष्करी चौक्यांवरही हल्ल्यांचे वृत्त आहे. पाकिस्तानचे माहिती मंत्री अत्ताउल्लाह तरार यांनीही अबोटाबाद, स्वाबी आणि नौशेरा येथे हल्ले झाल्याचे वृत्त दिले आहे, परंतु ते हाणून पाडल्याचा दावा त्यांनी केला आहे. दरम्यान, अफगाण सैन्याने तोरखम सीमेवरील खैबर येथील पाकिस्तानी लष्करी चौकीवर हल्ला करून ताबा मिळवला. तोरखम येथे दोन्ही देशांच्या सैन्यात झालेल्या भीषण चकमकीत अनेक पाकिस्तानी सैनिक जखमी झाले. अफगाणिस्तानच्या सैन्याने एका पाकिस्तानी सैनिकालाही ताब्यात घेतले. तालिबानने पाकिस्तानचे एफ-१६ लढाऊ विमान पाडल्याचा दावा केला आहे. जळत्या विमानाचा फोटो सोशल मीडियावर फिरत आहे, ज्याला अफगाण मीडियाने पाकिस्तानी एफ-१६ लढाऊ विमान म्हणून सांगितले आहे. मात्र, पाकिस्तानकडून अद्याप कोणतेही अधिकृत विधान आलेले नाही.

# 'निपुण' ऑनलाईन चाचणीतील अडचणींमुळे अध्यापन बाधित

## प्रक्रिया सुलभ करण्याची शिक्षकांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती** : महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती यांच्या वतीने 'निपुण' अंतर्गत घेतल्या जाणाऱ्या ऑनलाईन चाचण्यांतील तांत्रिक अडचणींमुळे विद्यार्थ्यांच्या दैनंदिन शैक्षणिक कार्यात अडथळे निर्माण होत असल्याची गंभीर बाब पुढे आली आहे. या पार्श्वभूमीवर सदर चाचणी प्रक्रिया सुलभ करावी, अन्यथा ती बंद करावी, अशी मागणी समितीने लेखी निवेदनाद्वारे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे करणार असल्याचे कळविले आहे.निपुण महाराष्ट्र अभियान अंतर्गत इयत्ता दुसरी ते पाचवीच्या विद्यार्थ्यांची दरमहा ऑनलाईन चाचणी घेतली जाते.




फेब्रुवारी महिन्याची चाचणी २३ तारखेपासून सुरू झाली असली, तरी वापरात असलेले प सुमार दर्जाचे असल्याने शिक्षकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. इंटरनेटची अपुरी सुविधा, पमधील तांत्रिक दोष आणि प्रणालीची कमी क्षमता यामुळे चाचणी वेळेत पूर्ण होत नसल्याची तक्रार आहे.तसेच प विद्यार्थ्यांचे बोली भाषेतील उच्चार आणि वाचनाची गती अचूक स्वीकारत नसल्याने पात्र विद्यार्थीही 'निपुण' ठरत नाहीत, अशी खंत व्यक्त करण्यात आली आहे. परिणामी, दिवसभराची अध्यापन प्रक्रिया विस्कळीत होत असून विद्यार्थ्यांचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन होण्याऐवजी ही चाचणीच अडथळा ठरत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.ग्रामीण व दुर्गम भागातील शाळांमध्ये ऑनलाईन सुविधा आणि इंटरनेट उपलब्ध नसताना दरमहा अतिरिक्त परीक्षा घेणे योग्य नसल्याचा प्रश्न शिक्षकांनी उपस्थित केला आहे. शासनाने निश्चित केलेल्या आकारीत व संकलित अशा चारच परीक्षांव्यतिरिक्त या अतिरिक्त चाचण्यांची आवश्यकता काय, हे शिक्षण विभागाने स्पष्ट करावे, अशी मागणी समितीने केली आहे.


सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. २८ फेब्रुवारी २०२६ शहर/ग्रामिण

# अमरावती सह २० जिल्हा परिषदांच्या निवडणुका पावसाळ्यानंतर!

## सर्वोच्च न्यायालयात २१-२२ जुलैला अंतिम सुनावणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अमरावती**

राज्यातील २० जिल्हा परिषदांच्या निवडणुकांसंदर्भात सर्वोच्च न्यायालयातील अंतिम सुनावणी लांबणीवर गेली आहे. आता ही सुनावणी २१ व २२ जुलै रोजी होणार आहे. त्यामुळे जिल्हा परिषदांच्या निवडणुका या पावसाळ्यानंतरच होण्याची शक्यता आहे. न्यायालयाची अंतिम सुनावणी पुढे ढकलल्या गेल्यामुळे अनेक इच्छुकांचा हिरमोड झाला आहे.

आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांवर गेल्याने सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी आरक्षणच रद्दबातल ठरविले. राज्य शासनाने न्यायालयात बाजू मांडत कायद्यातही बदल केला. त्यानंतर न्यायालयाने आरक्षण पूर्ववत केले. त्यामुळे रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला.

त्याअंतर्गतच राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायती, २९ महानगरपालिका व ३२ पैकी १२ जिल्हा



परिषदांच्या निवडणुका झाल्या. परंतु २० जिल्हा परिषदांच्या निवडणुका होणे शिल्लक आहे. याची सुनावणी कधी होते याकडे इच्छुकांचे तसेच राजकीय पक्षांचे लक्ष लागले होते. मात्र न्यायालयाने आता जुलै महिन्यात अंतिम सुनावणी घेण्यात येईल, असे स्पष्ट केले आहे. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात आठवडाभरात राज्य शासनाने नोडल अधिवक्ता नेमण्याचे निर्देश दिले आहेत.

जुलै महिन्यात अंतिम सुनावणी झाल्यानंतर संपूर्ण प्रक्रिया राबविण्यास राज्य निवडणूक आयोगाला वेळ लागेल. त्यामुळे ऑगस्ट-सप्टेंबरनंतरच निवडणुका होऊ शकतील.

# खाकी वर्दीतील 'डीप्टी' होण्यासाठी आता नवे 'फिल्टर' लागणार

## निकष अधिक कडक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

महाराष्ट्रपोलिस दलातील वरिष्ठ पदांवर काम करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या तरुणांसाठी आणि खात्यांतर्गत पदोन्नतीच्या प्रतीक्षेत असलेल्या अधिकाऱ्यांसाठी राज्य सरकारने नव्याने काही मार्गदर्शक तत्त्वे आखून दिली आहेत. पोलिस उपअधीक्षक आणि सहायक पोलिस आयुक्त यांसारख्या 'अ' दर्जाच्या पदांसाठी आता शैक्षणिक पात्रतेसोबतच शारीरिक तंदुरुस्ती आणि प्रशिक्षणाचे निकष अधिक कडक करण्यात आले आहेत. १९ जानेवारी रोजी गृह विभागाने यासंदर्भातील अधिसूचना जारी केली असून, यामुळे पोलिस प्रशासनात मोठे बदल होणार आहेत. ते नवे सेवाप्रवेश नियम २०२६ राज्यातील सर्व पोलिस घटकांनादेखील माहितीसाठी पाठविण्यात आले आहेत.

यानुसार, पोलिस उपअधीक्षक किंवा सहायक पोलिस आयुक्त या पदांसाठी ३० टक्के जागा थेट स्पर्धा परीक्षेद्वारे भरल्या जातील, तर ७० टक्के जागा अनुभवी पोलिस निरीक्षकांच्या पदोन्नतीतून भरल्या




जाणार आहेत. थेट भरतीसाठी उमेदवाराला कोणत्याही शाखेची पदवी असणे अनिवार्य आहे. वयोमर्यादेच्या बाबतीत, खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे आणि राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्षे ही कमाल मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. पुरुष उमेदवारांची उंची किमान १६५ सेंटीमीटर आणि छाती न फुगवता ८४ सेंटीमीटर असणे आवश्यक आहे. महिला उमेदवारांसाठी किमान १५७सेंटीमीटर उंचीचा निकष लावला आहे.

केवळ परीक्षा उत्तीर्ण होऊन चालणार नाही, तर नियुक्तीनंतर उमेदवारांना एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम 'सीपीटीपी' यशस्वीपणे पूर्ण करावा लागेल. जर कोणी या प्रशिक्षणात किंवा त्यानंतरच्या विभागीय परीक्षांमध्ये अपयशी ठरले, तर त्यांची सेवा समाप्त केली जाऊ शकते किंवा ते पुढील पदोन्नतीसाठी अपात्र ठरू शकतात.

**लहान कुटुंब हा निकषही सक्तीचा**

कौटुंबिक जबाबदारीचे भान राखण्यासाठी लहान कुटुंब हा निकषही सक्तीचा करण्यात आला आहे. ज्या उमेदवारांना दोनपेक्षा अधिक अपत्ये असतील, ते शासकीय सेवेसाठी अपात्र ठरतील. या नव्या नियमांमुळे राज्यातील पोलिस दलात केवळ तांत्रिकदृष्ट्या सक्षमच नव्हे, तर शारीरिक आणि प्रशासकीयदृष्ट्या उत्तम अधिकारी मिळण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# चांदुर बाजार तालुक्यातील आसेगाव परिसरात अवैध रेतीचा टिप्पर जप्त

## महसूल विभागाची धडक कार्यवाही




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८चांदूर बाजार**

चांदुर बाजार तालुक्यात आसेगाव परिसरात अवैध रेतीचा टिप्पर महसूल विभागाने ताब्यात घेतला आहे हे वाहन विक्की माहोरे याच्या मालकीचा असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे तालुक्यात रेती चोरीचे प्रमाण वाढले असून त्यावर नियंत्रण आणणेकरिता महसूल विभागाने आता पथके तयार केली आहेत ही पथके रेती चोरांवर नजर ठेवून आहेत त्यामुळे रेती तस्करांचे धाबे दनानले आहे तर काही तलाठी व महसूल अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष आहे आसेगाव परिसरात रेतीचोर चालक प्रवीण साबळे टिप्पर मधून चोरीच्या रेतीची वाहतूक करीत असल्याची खबर पथकाला मिळाली त्यावरून संबंधित महसूल पथकाने सापळा लावला दुपारी २ वाजता च्या सुमारास रेती चोर चालक प्रवीण व अवैध रेतीच्या टिप्पर वाहणाला तब्यात घेण्यात आले अशी माहिती तलाठी विपुल ठाकरे यांनी दिली आहे टिप्पर आसेगाव पोलीस स्टेशनच्या आवारात ठेवण्यात आले ही कारवाई तहसीलदार मनोज सोनारकर यांच्या मार्गदर्शनात मंडळ अधिकारी, तलाठी विपुल ठाकरे व मोहन पाखरे या महसूल पथकाने केली असून नियमानुसार दंड आकारुन वसूल करण्याची कार्यवाही सुरू आहे व अवैध रेती तसकरांन विरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु असल्याची माहिती महसूल अधिकारी यांनी दिली आहे.

# डाकघर बचत बँकेतून काढलेल्या रक्कमेत नोटा कमी

## अंजनगाव डाकघर कार्यालयात घडला प्रकार

**विर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी येथील डाक बचत बँकेत २४ फेब्रुवारी २०२६ रोजी माजी पंचायत समिती सभापती अमुताई हिरोळे यांनी १ लाख ५० हजार रुपये काढले. गर्दी असल्यामुळे कर्मचाऱ्यांवर विश्वास ठेवून त्यांनी घरी जाऊन पैसे मोजले, तेव्हा ४६०० रुपये (२०० रुपयांच्या २३ नोटा) कमी आढळले. दुसऱ्या दिवशी तक्रार केली तेव्हा डाक विभागाने आम्ही पूर्ण रक्कम दिली, तुम्ही काउंटरवरच मोजायला हवे होते असे सांगितल्या गेल्याने सरकारी कर्मचाऱ्यांवरील अतातायी विश्वास टाकणे व आपल्याकडुन झाल्याच्या चुकीवर पश्चाताप करण्याची वेळ आली आहे.मात्र त्यापायी त्यांना आर्थिक भुर्दंडासह मानसीक त्रासाला समोरे जावे लागले असुन संमधीता विरोधात तक्रार करण्यात आली आहे. माजी पंचायत समिती सभापती अमुताई हिरोळे यांनी शहरातील पोस्ट आफीसमधुन १,५०,००० रु काढले परंतु ते कमी भरले कश काउंटरवर पैसे मोजून घेणे ही ग्राहकाची प्राथमिक जबाबदारी असते काउंटर सोडल्यावर नंतर तक्रार करणे कठीण होऊ शकते. याची जानिव दोघाही माजी लोकप्रतीनीधी असलेल्या पतीपत्नीला असल्याने त्यांचे पती माजी सरपंच प्रेमदास हिरोळे व स्वतः यांनी आपली कैफीयत




पत्रकारांनसमोर मांडल्यावर त्यांच्या सोबतस्थानिक पत्रकार डाक विभागात सीसीटीव्ही फुटेज तपासणी करण्यासाठी साठी गेले असता बचतडाक विभागात गंभीर प्रकार उघडकीस आला. डाक विभागत कुठेही सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले नव्हते तर ग्राहकांना पैसे देत असतात तेथे पैसे मोजण्याची मशिनची उपलब्धता नव्हती तर पैशांचे बंडल मोजण्यासाठी अकाउंटवर बसलेला कर्मचारी हा कार्यालयातील बंद कॅबिन मधुन पैशांचे बंडल मोजून खातेदारांना देत होते. त्यामुळे ग्राहकांच्या नजरे आड हा होत असलेला गैर प्रकार लक्षात येत नाही असे सर्वांच्या निदर्शनास आले . मात्र खातेदाराला पैसे कमी मिळाले की दुसऱ्या खातेदाराला जास्तीची रक्कम देण्यात आली हा भाग चौकशीचा असल्याने अमुताई हिरोळे यांनी उघड केलेला हा प्रकार फक्त एक व्यक्तीचा नाही, तर पूर्ण यंत्रणेची उणीव दाखवतो. डाक विभागाने याची गंभीर दखल घेऊन सर्व शाखांमध्ये सिसिटीव्ही ,नोट मोजणी मशीन तातडीने बसवावीत जेने करुन आसले प्रकार घटण्यास पायबंद होईल. सदर प्रकाराबद्दल अमुताई हिरोळे यांनी लेखी तक्रार डाकघर विभाग प्रमुखांना व खासदार बळवंतराव वानखडे याबाबत चौकशी करण्यासाठी केली आहे.

**डाकघर विभागातील अधिकाऱ्यांचे मत**

आम्ही पुर्ण रक्कम खातेदाराला मोजून दिली आहे. खातेदाराने काऊंटर सोडण्यापूर्वी रक्कम मोजून घेने आवश्यक होते त्यामुळे हा काही आरोप आहे चुकीचा आहे असे डाक विभागातील अधिकारी यांचे मत आहे---बॉक्स)मी काऊंटरवर रक्कम मोजली नाही तीच माझी चुकी आहे. पण माझ्या १ लाख ५० हजार रुपयांच्या बडल मध्ये दोनशे रुपयांच्या २३ नोटा कमी होत्या. माझा हाच उद्देश माझ्या सोबत असे झाले असे इतर खातेदारा सोबत होऊ नये व भारतीय डाक विभागाने प्रत्येक अकाउंटवर पैसे मोजण्याची मशिन व सीसीटीव्ही कॅमेरे बसवावे जेणेकरून असा प्रकार कोणासोबत होणार नाही **(खातेदार अमुताई हिरोळे)**

# पालकमंत्र्यांचे आदेश धाब्यावर?

## बोअरवेल-हातपंप गैरव्यवहार चौकशीत विलंब

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती-** पंधराव्या वित्त आयोगांतर्गत अमरावती जिल्ह्यात करण्यात आलेल्या बोअरवेल व हातपंप उभारणीच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक अनियमितता झाल्याच्या तक्रारीनंतरही चौकशीला विलंब होत असल्याने जिल्हा परिषद प्रशासनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणी जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी चौकशीचे आदेश दिले असल्याची माहिती आहे. तसेच मा. विभागीय आयुक्त, अमरावती व अप्पर जिल्हाधिकारी यांनीही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांना चौकशीसंदर्भात सूचना दिल्याचे सांगितले जाते.मात्र, या सर्व आदेशांनंतरही प्रत्यक्ष कार्यवाही होत नसल्याचा आरोप भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष नकुल सोनटक्के यांनी केला आहे.काय आहे प्रकरण?ग्रामपंचायत येवदा येथे १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून बोअरवेल व हातपंप उभारणीसाठी मोठ्या प्रमाणावर खर्च दाखविण्यात आला. तांत्रिक मान्यतेनुसार २०० फूट ड्रिलिंग अपेक्षित असताना प्रत्यक्षात कमी खोलीपर्यंत कामे झाल्याचा आरोप आहे. मात्र पूर्ण क्षमतेचे बिल अदा करण्यात आल्याने लाखो रुपयांचा अपव्यय झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. बोअर वेल व हातपंपाच्या चौकशीबाबत येवदा येथील नागरिकांनी सुद्धा मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांना लेखी तक्रार सादर केली आहे. तसेचयापूर्वीही ग्रामपंचायत येवदा येथे १५ व्या वित्त आयोगांतर्गत नीलकमल खुर्ची खरेदी प्रकरण व एलईडी स्ट्रीट लाईट खरेदीतील अनियमिततेच्या तक्रारी ताज्या असतानाच आता पाणीपुरवठा कामांवरही संशयाची छाया पडली आहे.

**चौकशीत विलंब का? - सोनटक्के यांचा सवाल-** पालकमंत्र्यांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशीचे निर्देश दिल्यानंतरही जिल्हा परिषद प्रशासनाकडून टाळाटाळ का केली जात आहे? असा थेट सवाल सोनटक्के यांनी उपस्थित केला आहे.सदर प्रकरणात ठेकेदार, ग्रामविकास अधिकारी, उपविभागीय



**जिल्हा परिषद प्रशासनावर संगनमताचे आरोप**

अभियंता (पाणीपुरवठा विभाग), गटविकास अधिकारी व जिल्हा परिषदेतील काही वरिष्ठ अधिकारी यांच्या संभाव्य सहभागामुळेच कार्यवाहीस विलंब होत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.तांत्रिक मान्यतेनुसार कामे पूर्ण न झाल्याचा दावा करत प्रशासन-ठेकेदार संगनमताची सखोल चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

जिल्हाभर विशेष लेखापरीक्षणाची मागणीसंपूर्ण अमरावती जिल्ह्यात अशाच प्रकारचे प्रकार घडले असण्याची शक्यता व्यक्त करत पंधराव्या वित्त आयोगांतर्गत झालेल्या सर्व बोअरवेल व हातपंप कामांचे विशेष तांत्रिक व आर्थिक लेखापरीक्षण करण्याची मागणी करण्यात आली आहे.प्रशासनाची भूमिका?या संदर्भात जिल्हा परिषद प्रशासनाची अधिकृत भूमिका समजू शकली नाही. मात्र, प्रशासनाने लवकरात लवकर पारदर्शक चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, या सर्व आरोपांमुळे शासनाची प्रतिमा मलीन करण्याच काम प्रशासनाकडून होत आहे. त्यामुळे महायुती सरकारवरच्या कामाबाबत गैरसमाज सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण होत आहे. असे मत सोनटक्के यांनी व्यक्त केले.

# अमरावती एपीएमसी विभाजनाला १७ जणांचे आक्षेप

## अधिसूचनेवर तीव्र हरकती, मागे घेण्याची मागणी

### समितीचे विभाजन व्हावे यासाठी पाच अर्ज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती -** बाजार समितीचे विभाजन करीत भातकुली तालुक्यासाठी स्वतंत्र कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापन करण्यासंदर्भात काढण्यात आलेल्या




अधिसूचनेवर तीव्र हरकती नोंदविण्यात आल्या असून, ही अधिसूचना तात्काळ मागे घ्यावी, या मागणीसाठी १७सहकार क्षेत्रातील व्यक्तींनी अर्ज केलेले आहेत. या बाजार समितीचे विभाजन व्हावे याकरिता पाच अर्ज सहकार विभागाकडे प्राप्त झाले आहेत.शासनाकडून मुख्यमंत्री बाजार समिती योजनेअंतर्गत तालुकास्तरावर बाजार समिती स्थापन करण्याला सुरूवात झाली आहे. अशातच स्वतंत्र भातकुली बाजारसमितीची अधिसुचना २२ जानेवारी रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. यामध्ये विदर्भात दुसऱ्या क्रमाकाची असलेल्या अमरावती बाजार समिती मधून भातकुलीतालुका वेगळा करीत दोन्ही बाजार समितीला स्वंतत्र दर्जा देण्यात आला आहे. यावर २८ फेब्रुवारी पर्यंत आक्षेप हरकती मागविण्यात आले. शुक्रवार, २७फेब्रुवारीपर्यंत बाजार समितीच्या विभाजनाला १७ जणांनी आक्षेप घेत भातकुलीचे विभाजन करू नका अशी मागणी केली आहे. तर विभाजनाच्या समर्थणार्थ केवळ ५ अर्जप्राप्तझाले आहेत. या अर्जावर जिल्हा उपनिबंधकाकडे सुनावणी होऊन त्यानंतर अंतिम निर्णय घेतल्या जाणार आहे.

**विभाजनाचा डाव हाणून पाडू**



दोन्ही तालुक्यांतील मोठ्या प्रमाणातील शेतमालामुळेच या बाजार समितीची आर्थिक घडी मजबूत राहिली आहे. भातकुली, आष्टी आणि खोलापूर येथील उपबाजार पेठांवर यापूर्वी लाखो रुपये खर्च करण्यात आले, मात्र त्या आजही भंगारवस्थेत आहेत. पुन्हा स्वतंत्र बाजार समिती स्थापन केल्यास कोट्यावधी रुपयांचा खर्च होऊनही त्यातून काहीही निष्पन्न होणार नाही. त्यामुळे विभाजनाचा डाव हाणून पाडण्याकरिता सर्व पक्षीय कृती समिती स्थापन करू.

**हरीभाऊ मोहोड,** संचालक,जिल्हा मध्यवती बँक.

# जिल्हापरिषद मुख्यालयातील अंतर्गत रस्ते रखडले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८मोर्शी** जिल्हा परिषदेच्या परिसरातील अंतर्गत रस्त्यांच्या बांधकामाचा मुहूर्त अद्याप निघालेला नाही. मागील पाच ते सहा महिन्यांपासून निविदा प्रक्रिया काढण्यात आली आहे, मात्र अद्यापही या कामाला हात लावण्यात आलेला नाही. जिल्हापरिषदेचे मुख्यालय आयएसओ प्रमाणित असले तरी अंतगत रस्ते मात्र ग्रामीण भागातील रस्त्यांप्रमाणेच झालेले आहेत, गेली अनेक वर्षे या रस्त्यांवर कामेच झाली नसल्याने ही दुरवस्था झाली आहे. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसह सर्वच विभाग प्रमुख याच रस्त्यांवरून जातात, मात्र निविदा प्रक्रिया झाल्यानंतरही रस्त्यांची कामे सुरू झाली नाही. दुसरीकडे जिल्हापरिषदेच्या विश्रामगृहात तात्पुरती डागडुजी करण्यासाठी लाखो रुपयांची बिले काढण्यात आल्याची चर्चा सुद्धा मिनीमंत्रालयात रंगली आहे. यंदाच्या जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पामध्ये अंतर्गत रस्ते, प्रसाधनगृह तसेच सौंदर्यीकरणासाठी भरीव निधीची तरतूद करण्यात आली होती. मात्र, जिल्हा परिषदेच्या मुख्यालयातील रस्त्यांना आता मंजुरीची प्रतीक्षा लागली आहे.



# होळी रे होळी!:धूलिवंदन मंगळवारी ३ मार्च रोजीच, चंद्रग्रहणाच्या काळातही साजरा करता येणार सण, पंचांगकर्ते मोहन दाते यांची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९छत्रपती संभाजीनगर**

यंदा ३ मार्च रोजी चंद्रग्रहण आहे. त्यामुळे धूलिवंदन साजरा करता येणार की नाही, रंग खेळणे जमणार की नाही, याबद्दल नाना शंका कुशंका व्यक्त केल्या जात होत्या. मात्र, चंद्रग्रहण असूनही याच दिवशी धूलिवंदनाचा दिवस साजरा करता येईल. रंग खेळता येईल, अशी माहिती पंचांगकर्ते मोहन दाते यांनी दिली.



धूलिवंदनादिवशी मंगळवारी चंद्रग्रहणाचे वेध सकाळी सूर्योदयापासून सुरू होत आहेत. या वेदकाळामध्ये संपूर्ण दिवसभरामध्ये आपले नित्य नैमित्तिक पूजा, अर्चा अभिषेक, श्राद्ध इत्यादी सर्व धार्मिक कृत्ये आपण करून शकतो, अशी माहितीही दाते यांनी दिली.

**पौर्णिमा प्रदोषकाळात नाही**

पंचांगकर्ते मोहन दाते म्हणाले की, 'यावर्षी २ मार्च रोजी सोमवारी होलिकादहन आहे. ते संध्याकाळी सूर्यास्तानंतर प्रदोषकाळात आपल्याला नेहमीप्रमाणे करायचे आहे. दुसऱ्यादिवशी पौर्णिमा प्रदोषकाळात नाही. तसेच या दिवशी चतुर्दशी आहे. त्यामुळे सूर्यास्तानंतर आपण नेहमीप्रमाणे भद्रा असतानासुद्धा होलिकादहन करायचे आहे.

पंचांगकर्ते मोहन दाते म्हणाले की, 'मंगळवार ३ मार्च रोजी धूलिवंदनाचा दिवस आहे. या दिवशी चंद्रग्रहण आहे. हे चंद्रग्रहण ग्रसतोदित असल्याने सूर्यास्तानंतर संध्याकाळी ६ वाजून ४८ मिनिटापर्यंत या काळामध्येत ते आपल्याला दिसणार आहे. त्याचा स्पर्श दुपारी ३ वाजून २० मिनिटांनी आहे. स्पर्श आणि मध्य दिवसा असल्यामुळे हे चंद्रग्रहण भारतात दिसणार नाही.

**रंग खेळू शकतो**

पंचांगकर्ते मोहन दाते म्हणाले की, 'अर्थात या सर्व गोष्टी करता येत असल्यामुळे जो धूलिवंदनाचा दिवस आहे त्या दिवशी होळी, रंग खेळणे इत्यादी सर्व गोष्टी आपण करू शकतो. त्याला कोणताही निषेध नाही. धूलिवंदनाच्या दिवशी जरी चंद्रग्रहण असले तरी आपण होळीचा, रंगखेळण्याचा सण साजरा करू शकतो.' त्यांनी धूलिवंदनाच्या साऱ्यांना शुभेच्छाही दिल्या.

**ग्रहण सूर्यास्तानंतर दिसेल**

पंचांगकर्ते मोहन दाते म्हणाले की, 'मंगळवार ३ मार्च रोजी धूलिवंदनाचा दिवस आहे. या दिवशी चंद्रग्रहण आहे. हे चंद्रग्रहण ग्रसतोदित असल्याने सूर्यास्तानंतर संध्याकाळी ६ वाजून ४८ मिनिटापर्यंत या काळामध्येत ते आपल्याला दिसणार आहे. त्याचा स्पर्श दुपारी ३ वाजून २० मिनिटांनी आहे. स्पर्श आणि मध्य दिवसा असल्यामुळे हे चंद्रग्रहण भारतात दिसणार नाही.'

# ऐन होळीच्या दिवशी महिला व बालकल्याण विभागाच्या मुलाखती

## २६३ उमेदवारांना जावे लागणार पुण्याला, १४४ महिलांचा समावेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८नागपूर-** महिला व बाल कल्याण समिती अध्यक्ष, सदस्य व बाल न्याय मंडळ सदस्य पदाकरिता उमेदवारांच्या मुलाखती पुणे येथे २ ते ४ मार्चदरम्यान घेण्यात येणार आहेत. याच कालावधीत होळीचा सण असल्याने या दिवसांत मुलाखती कशा ठेवल्या? असा प्रश्न उमेदवारांनी उपस्थित केला आहे. होळी आणि धुळवडीच्या दिवसांत महिला उमेदवार मुलाखतीसाठी कशा जाऊ शकतील? सहा जिल्ह्यांतून एकूण २६३ उमेदवारांना या मुलाखतीसाठी

हजर राहावयाचे असून, त्यात १४४ महिलांचा समावेश आहे. त्यात वर्धा जिल्ह्यातील १८ महिलांची नावे आहेत. महिला व बाल कल्याण समिती अध्यक्ष, सदस्य व बाल न्याय मंडळ सदस्य पदाकरिता ज्या उमेदवारांनी अर्ज केले आहेत, त्यांच्या वैयक्तिक मुलाखतींसाठी २५ फेब्रुवारीला त्यांना पत्र प्राप्त झाले. महिला व बाल कल्याण समिती अध्यक्ष व सदस्य पदाच्या २८ रिक्त जागांसाठी, तसेच बाल न्याय मंडळ सदस्य पदाच्या १२ रिक्त जागांसाठी या मुलाखती घेण्यात येणार आहेत. या मुलाखती पुणे येथे होणार असून, यासाठी बीड, वर्धा, सोलापूर, धुळे, नाशिक व जळगाव जिल्ह्यातील एकूण २६३ उमेदवारांना मुलाखतीसाठी हजर राहावयाचे आहे. महिला बालकल्याण समिती अध्यक्ष, सदस्य व बाल न्याय मंडळ सदस्य पदाच्या मुलाखतीकरिता वर्धा जिल्ह्यातील १८, जळगाव जिल्ह्यातील २०, नाशिक जिल्ह्यातील २७, धुळे जिल्ह्यातील १३, सोलापूर जिल्ह्यातील ३९, तर बीड जिल्ह्यातील २७ महिलांचा समावेश आहे.

महिलांच्या सुरक्षेचाही प्रश्न २ ते ४ मार्च या कालावधित या मुलाखती होणार आहेत. ३ मार्चची होळी असून, ४ मार्चला धुळवड असल्याने तेव्हा महिला उमेदवार मुलाखतीसाठी कशा उपस्थित राहू शकतील? महिलांना या दिवसांत घराबाहेर पडणेही कठीण असते, अशा परिस्थितीत किती महिला स्वतःच्या गावावरून पुणे येथे मुलाखतीसाठी जाऊ शकतील? हा प्रश्नच आहे. होळी आणि धुळवड या दोन्ही दिवशी मुलाखतीसाठी प्रवसा करणे म्हणजे महिलांच्या जिवावर बेतण्यासारखेच आहे. कारण या दिवसात ऑटो, टॅक्सी व प्रवासी वाहनांचे प्रमाण कमी असते. एकट्या महिलेने अशावेळी प्रवास करणेही धोक्याचे असते. या भीतीने अनेकांची संधी हिरावण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# तीन नवीन ठाणे, शहरात सीसीटीव्हीच्या प्रस्तावाला मंजूरी द्यावी- आमदार खोडके


## महापालिकेची नवीन इमारत, अंबादेवी विकास आराखडा प्रस्तावावर चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

शहरातील पोलिस यंत्रणा अधिक सक्षम करण्याची गरज आहे. शहराचा विस्तार झपाट्याने होत आहे, लोकवस्ती वाढत आहे. शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये, म्हणून शहर पोलीस आयुक्तालयात तीन नवीन पोलिस ठाणे निर्माण करण्याची गरज आहे.

याबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे, तसेच शहरात सुरक्षेच्या दृष्टीने जागोजागी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावे, अशी मागणी करुन या दोन्ही प्रस्तावाला मंजूरी द्यावी, अशी मागणी यावेळी सभागृहात बोलताना आमदार संजय खोडके यांनी केली आहे.

अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये सन २०२५-२६ च्या पुरवणी मागणीवर चर्चा करतांना आमदार संजय खोडके यांनी शहर विकासाच्या दृष्टीने नगरविकास, आरोग्य व वैद्यकीय शिक्षण तसेच गृह विभागाशी संबंधित विविध मुद्द्यांवर चर्चा केली. महानगर पालिकेची नविन प्रशासकीय इमारत व अंबादेवी विकास आराखडा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला असून त्यास शासनाच्यावतीने मंजुरी प्रदान करण्याची मागणी अधिवेशनातुन करण्यात आली आहे. शहरातील बऱ्याच पोलीस स्टेशनच्या इमारती या जुन्या झाल्या असल्याने नवीन इमारत बांधण्यात यावी, पोलीस वसाहती शिकस्त झाल्याने नवीन वसाहती बांधण्याकरिता शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आल्याने तो प्रस्ताव मंजूर करून निधी देण्यात यावा, याबाबतसुद्धा आमदार खोडके यांनी अधिवेशनातुन मागणी केली.



महानगरपालिका क्षेत्रातील भुयारी गटार योजना गेल्या २८ वर्षांपासून निधी अभावी अर्धवट आहे. शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता व पुढील तीस वर्षाचे भुयारी गटार योजनेचे नियोजन करायचे असल्याने शहरात भुयारी गटार योजनेचा सुधारित प्रारूप कृती आराखडा हा २ हजार कोटींवर गेला आहे. स्वच्छतेच्या दृष्टीने हि योजना अत्यंत महत्वाकांक्षी असल्याने शासनाने याबाबत बैठक घेऊन योजनेच्या २ हजार कोटींच्या आराखड्यास मंजुरी देण्याची मागणी आमदार संजय खोडके यांनी केली. महानगर पालिकेला नगरोत्थान योजनेतून अनुदान वितरित होत असतांना ७० टक्के भार हा शासन व ३० टक्के हिस्सा महापालिकेला द्यावा लागतो.

अमरावती मनपाची आर्थिक स्थिती पाहता मनपा ३० टक्के हिस्सा देऊ शकत नाही. त्यामुळे शहरात पायाभूत सुविधांची कामे करतांना अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे नगरोत्थान योजनेतील महापालिकेचा हिस्सा हा ३० टक्के ऐवजी १० टक्के इतका करण्यात यावा, म्हणजे महापालिकेला केवळ १० टक्के भार उचलणे शक्य होणार असल्याने शासनाकडून नगरोत्थान योजनेअंतर्गत महापालिकेला अनुदान मिळेल व विकास कामे करणे सोयीचे होणार असल्याचे आमदार संजय खोडके यांनी सांगितले.

जिल्ह्यातील रुग्णांना वैद्यकीय सुविधांचा लाभ मिळणे हेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याचे उद्दिष्ट आहे. मात्र अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्यासाठी निवडण्यात आलेली जागा ही शहरापासून १३ ते १४ किलोमीटर लांब असल्याने तेथे रुग्णांना जाणे दुरापास्त होणार आहे. जिल्ह्यातील मेळघाटसह इतरही तालुक्यातील रुग्णांना सोयीचे होईल, या दृष्टीने शहरालगत नागपूर हायवेवरील जागेचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा किंवा दुसरा पर्याय म्हणून जिल्हा स्त्री रुग्णालय व सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल परिसरात जर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय साकारल्यास यासाठी अपेक्षित असलेला खर्च ५०० कोटीऐवजी केवळ २०० कोटीमध्येच वैद्यकीय महाविद्यालय सुरु करता येणार असल्याचे आमदार खोडके यांचे म्हणणे आहे.

# वरूड शहरातील कृष्णा लॉजवर चालणाऱ्या वेश्या व्यवसायावर धाड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

वरूड शहरातील कृष्णा लॉजवर चालणाऱ्या वेश्या व्यवसायावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धाड घालून एका आरोपीला जेरबंद केले.

वरूड शहरातील बसस्थानक परिसरात कृष्णा लॉज आहे. येथे महिलांना आणून वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडण्यात येत होते. याबाबतची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला प्राप्त झाली होती. या पथकाने माहितीची शहानिशा करून त्यात सत्यता आढळल्याने वरूड पोलिसांनाही याबाबत माहिती देण्यात आली. त्यानुसार वरूड पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने संयुक्तरित्या कृष्णा लॉजवर छापा टाकण्याकरिता सापळा रचला. लॉजमध्ये बनावट ग्राहक पाठविण्यात आले. त्यानंतर पोलिसानी धाड घातली असता प्रमोद रघुनाथ चव्हाण (वय ४५, मेन रोड वरूड) हर कुंटणखाना चालवित असल्याचे निष्पन्न झाले. त्याच्या ताब्यातून दोन महिला मिळून आल्या. प्रमोद चव्हाण याच्या ताब्यातून दोन मोबाईल, साहित्य व रोख रक्कम असा एकूण १३ हजार २६० रूपये असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. प्रमोद चव्हाण याला वरूड पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले.याकारवाईत वरूडचे ठाणेदार अर्जुन ठोसरे, एलसीबीचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे, उपनिरीक्षक नितीन इंगोले, राजू मडावी, सुनील महात्मे, निलेश डांगोरे, स्वप्निल तंवर, संजय प्रधान, सचिन भगत, पुष्पा गावंडे यांचा समावेश होता.

# मायानगरमध्ये मोफत महिला आरोग्य तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

## डॉ. विशाल काळे यांचे सामाजिक आरोग्य अभियान वेगात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

महानगरपालिका अंतर्गत असलेल्या सार्वजनिक विभाग हमालपुरा शहरी आरोग्य केंद्र अंतर्गत आरोग्य वर्धनी केंद्र मायानगर परिसरातील शिव मंदिर संस्थान येथे मोफत महिला रोगनिदान तपासणी व बालरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाचे अध्यक्ष मनपाचे आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांनी मनपा आरोग्य विभाग प्राथमिक स्वरूपात महिला, बालक वा कोणताही व्यक्ती याच्या आरोग्याचे रोग निदान झाले पाहिजे व त्यांना कोणत्याही परिस्थितीत उपचार देण्यात येईल



याची खात्री दिली व आश्वासन दिले. सूतगिरणीचे नगरसेवक संजय गव्हाळे यांनी सुद्धा असे शिबीर संपूर्ण परिसरात घ्यावे त्यासाठी प्रसार प्रचार करण्याकरिता मदत करील असे सांगितले. साथ रोग नियंत्रण अधिकारी डॉ. रुपेश खडसे यांनी मनपाच्या वतीने सर्व रक्ताच्या तपासणी मोफत होतात, आरोग्य तपासणी मोफत होतात. डेंग्यू, मलेरिया, चिकन गुनिया, हत्तीपाय सारखे आजार न होण्यासाठी प्रतिबंध उपाय करण्यावर जोर दिला.क्षयरोग अधिकारी डॉ. फिरोज खान यांनी टीबी मुक्त शहर करण्यासाठी प्रतिबंध उपाय व उपचार करण्यासाठी मार्गदर्शन केले. कर्करोग तज्ज्ञ डॉ. आयुष हेडा यांनी शरीरात गाठ किंवा आजार माहिती पडल्यास तत्काळ डॉक्टरांना दाखवावे असे सांगितले. डॉ मानसी मुरके यांनी प्रास्ताविककेले.कार्यक्रमात आरोग्य निरीक्षक हैदर अली, डॉ. साक्षी हेडा यांनी महिलांची तपासणी केली. डॉ विनंती नवरे, डॉ. सूर्यवंशी, बबन खंडारे, केने, रेणुका भागवत, प्रेरणा सातपुते, पायल ठाकूर, श्रेयस नाडे, सुप्रिया जाधव, दुर्गा वासनिक, प्रफुल गवई, प्रिया सोनुले, कुणाल शिंदे, डॉ. सपना वानखेडे, डॉ. कौस्तुभ देशमुख, विलास नकाशे यांनी कार्यक्रमासाठी मदत केली. कार्यक्रमाचे सूत्र संचालन आरोग्य सेवक बबन खंडारे यांनी केले.

# अजित दादा गेले! महाराष्ट्र सुन्न करणाऱ्या घटनेला १ महिना पूर्ण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८ मुंबई-** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाला आज एक महिना पूर्ण झाला. २८ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता अजित पवारांच्या निधनाची बातमी धडकली अन् अवघा महाराष्ट्र शोकसागरात बुडाला. अजित पवार यांच्या निधनानंतर राज्याच्या राजकारणात अभूतपूर्व घडामोडी घडल्या. अजित पवार यांच्या निधनावरुन संशयाचं धुकं दाट होत असतानाच राजकीय वर्तुळातही मोठा सत्तासंघर्ष पाहायला मिळाल्या. आज एक महिना उलटूनही अजित पवार यांच्या अपघातप्रकरणाबाबत असे अनेक प्रश्न आहेत, ज्याची उत्तरे अद्याप

## ३० दिवसात काय- काय घडलं?



मिळाली नाहीत. नेमकं काय घडलं? या एका महिन्यात

**एका महिन्यात काय घडलं?**

अजित पवार बारामतीकडे रवाना: २८ जानेवारी रोजी अजित पवार यांचा नियोजित बारामती दौरा होता, त्यासाठी त्यांना घेऊन व्हीएसआर या खासगी कंपनीचे विमान सकाळी ८.१० वाजता मुंबईकडून बारामतीच्या दिशेने रवाना झाले.

**विमान दुर्घटनाग्रस्त:** विमान ८.५० ला बारामती विमानतळावर उतरणार होते, मात्र लँडिंग करताना विमानावरील नियंत्रण सुटले अन् दुर्घटनाग्रस्त झाले. सकाळी ९ वाजता या दुर्दैवी विमान अपघातात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह ५ जणांचा मृत्यू झाल्याची अधिकृत बातमी आली अन् महाराष्ट्रभर शोककळा पसरली.

अजित पवार यांचा मृत्यू, महाराष्ट्रावर शोककळा: लोकनेते अजित पवार यांच्या निधनाची बातमी महाराष्ट्रभर पसरली अन् गावागावात दुकाने, बाजारपेठा बंद झाल्या. पुण्यासह अनेक शहरांमध्ये कडकडीत बंद पाळण्यात आला. राज्याच्या कानाकोपऱ्यातून नागरिकांनी बारामतीकडे धाव घेतली.

**राज्यात शासकीय दुखवटा:** अजित पवार यांच्या निधनानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून राज्यात तीन दिवस शासकीय दुखवटा जाहीर करण्यात आला. सर्व शासकीय कार्यालयावरील ध्वज अर्ध्यावर उतरवण्यात आले.

**अजित पवार यांच्यावर अंत्यसंस्कार:** २९ जानेवारी रोजी अजित पवार यांच्यावर विद्याप्रतिष्ठानच्या प्रांगणात अंत्यसंस्कार करण्यात आले. अजित पवार यांच्या अंत्यसंस्काराला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच देशभरातील बडे नेते, राज्यातील नेते, कलाकार, उद्योग विश्वातील दिग्गज उपस्थित होते.

**राजकीय वारसदार कोण?**

अजित पवार यांच्या अंत्यसंस्कारानंतर लगेचेच त्यांचे राजकीय वारसदार ठरवण्याची चर्चा सुरु झाल्या. एकीकडे अंत्यसंस्कार होत असतानाच बारामतीमध्येच याबाबत बैठका झाल्याचं सांगण्यात आले. अजित पवार यांच्या जागी सुनेत्रा पवार या उपमुख्यमंत्री होतील, अशी चर्चा सुरु झाली.

**सुनेत्रा पवार यांचा शपथविधी:** ३१ जानेवारी रोजी अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्या राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्रीही ठरल्या.

**सुनेत्रा पवार खातेवाटप:** शपथविधीनंतर दोन दिवसात सुनेत्रा पवार यांचे खातेवाटप करण्यात आले. त्यांच्याकडे राज्य उत्पादन शुल्क, अल्पसंख्यांक विकास आणि क्रीडा व युवक कल्याण मंत्रालयांची जबाबदारी देण्यात आली. ४० हून अधिक आमदारांची एकजूट राखण्यासाठी सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादी विधीमंडळ पक्षनेतेपदी निवड करण्यात आली.

# अमरावती मनपाकडून 'मिळकत कर अभय योजना २०२६' जाहीर

## थकित मालमत्ता करावरील दंडावर ५० टक्के सूट; लाभ घेण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२८अमरावती**



शहरातील कर धकबाकीदार नागरिकांना मोठा दिलासा देत अमरावती महानगरपालिकेने 'मिळकतकर अभय योजना २०२६' जाहीर केली आहे. या विशेष योजनेअंतर्गत थकीत मालमत्ता करावरील दंडाच्या रकमेवर तब्बल ५० टक्के सूट देण्यात येणार आहे. ही योजना २८ फेब्रुवारीपर्यंत मर्यादित कालावधीसाठी लागू राहणार असल्याने नागरिकांनी तात्काळ लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.महानगरपालिकेने दंडाच्या रकमेतील निम्मी रक्कम माफ केल्यामुळे नागरिकांवरील आर्थिक ताण लक्षणीयरित्या कमी होणार आहे. जुनी थकबाकी नियमित करण्यासाठी ही एक सुवर्णसंधी असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.

**मनपा आयुक्तांचे आवाहन-**

नागरिकांनी ही योजना केवळ सवलतीची संधी म्हणून नव्हे, तर शहराच्या विकासासाठी आपले योगदान म्हणूनही पहावे. ही योजना २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंतच लागू राहणार आहे. त्यानंतर नियमित दंड आकारणी पुन्हा सुरू होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे अंतिम तारखेची वाट न पाहता त्वरित मालमत्ता कर भरणा करावा, असे आवाहन अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी केले आहे.


ऑनलाईन सुविधानागरिकांना सुलभतेने कर भरता यावा यासाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मालमत्ता कर भरण्यासाठी महानगरपालिकेच्या ु.रीर्रीर्रीळाले.ीस या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी. याशिवाय, अधिक माहितीसाठी नागरिकांनी थेट अमरावती महानगरपालिकेच्या संबंधित विभागाशी संपर्क साधावा.-

# खा. देशमुख यांच्या वाहनाला अपघात

## मानेला गंभीर दुखापत, साखराजवळ टिप्परने दिली जोराची धडक; वाहनाचे नुकसान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८दिग्रस-** दिग्रस तालुक्यातील साखरा परिसरात गुरुवारी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास उबाठा गटाचे खासदार संजय देशमुख यांच्या ताफ्यातील वाहनाला एका भरधाव टिप्परने पाठीमागून जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात खासदारांच्या मानेला गंभीर दुखापत झाली आहे. त्यांच्या वाहनाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सुदैवाने, वाहनातील इतर तीन प्रवासी सुखरूप आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, खासदार संजय देशमुख हे (एमएच -२९ -बीव्ही- ०३३३) क्रमांकाच्या वाहनाने प्रवास करत होते. त्यावेळी साखरा गावाजवळ ही घटना घडली. रेल्वेच्या कामात असलेल्या भरधाव टिप्परने खासदारांच्या गाडीला मागून जोरदार धडक दिली. धक्कादायक बाब म्हणजे, टिप्पर चालक हा मद्यधुंद अवस्थेत असल्याची चर्चा प्रत्यक्षदर्शींत होती. दोषी चालकावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. अपघातानंतर खासदार संजय देशमुख यांना तातडीने दिग्रस येथील हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले आहे.

# नगराध्यक्षपदी भाजपच्या रंजना आडे यांची वर्णी, काँग्रेसला धक्का

## नगरसेवकांनी पक्षाचा व्हीप झुगारल्याने मोठी खळबळ



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८यवतमाळ**

अत्यंत चुरशीच्या आणि राजकीय नाट्यमय घडामोडींनंतर महागाव नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजपने बाजी मारली आहे. भाजपच्या रंजना दीपक आडे यांची बहुमताने नगराध्यक्षपदी निवड झाली आहे. या निवडीमुळे महागावच्या राजकारणात भाजपची पकड अधिक मजबूत झाली आहे. दुसरीकडे, काँग्रेसच्या नगरसेवकांनी पक्षाचा आदेश (व्हीप) धाब्यावर बसवल्याने काँग्रेसला मोठा राजकीय हादरा बसला आहे.

महागाव नगर पंचायतमध्ये मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या राजकीय घडामोडींना अखेर ब्रेक लागला आहे. काँग्रेसप्रणित अपक्ष नगरसेविका असलेल्या नगराध्यक्षा सुनंदा दिलीपराव कोपरकर यांच्यावरील अविश्वास ठराव पारित करण्यासाठी काँग्रेसच्याच नगरसेवकांनी पक्षाचा व्हिप झुगारला होता. याच बंडखोर काँग्रेस नगरसेवक व शिवसेना नगरसेवकांच्या साथीने भाजपाने याठिकाणी सत्ता स्थापनेचा दावा केला होता. अविश्वास ठराव पारित झाल्यानंतर त्यांनी भाजपाकडून सत्ता स्थापनेसाठी हालचाली सुरू केल्या आहेत.

नगरसेवकांनी झुगारला व्हीप सत्ताधारी काँग्रेसच्या अंतर्गत सुरू असलेल्या बंडाळीमुळे काँग्रेसचे नगरसेवक परवेज सुरैय्या, जयश्री संजय नरवाडे, जयश्री इंगोले यांनी बंडाचा झेंडा हाती घेतला. नगराध्यक्षावरील अविश्वास प्रस्तावाचा व्हीप झुगारला. त्यानंतर आज नगराध्यक्ष निवडी करीता काँग्रेस गटनेते शैलेश कोपरकर यांनी नगरसेवकांसाठी व्हिप जारी केला होता. परंतु काँग्रेसच्या तीन नगरसेवकांनी पक्षाचा व्हीप झुगारून विरोधात मतदान केले.

# मराठी शाळा बंद करण्याचा निर्णय मागे घ्या : मराठी राजभाषा गौरव दिन, डेमोक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडियाच्या वतीने मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८नांदगाव खंडेश्वर**

मराठी राजभाषा गौरव दिना निमित्ताने डेमोक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया राज्य कमिटीच्या वतीने निवेदन देण्याचे ठरवले होते. त्याचाच एक भाग म्हणून डेमोक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या वतीने तहसीलदारांमार्फत शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे यांना निवेदन पाठवले.




महाराष्ट्र ही संतांची, समाज सुधारकांची व ज्ञान परंपरेची भूमी आहे. या भूमीत मराठी भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती आपल्या संस्कृतीची ओळख आहे, अस्मितेचा आणि सामाजिक प्रबोधनाचा आधारस्तंभ आहे. मात्र, अत्यंत खेदाने नमूद करावे लागते. की राज्यातील मराठी शाळांची स्थिती दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. अलीकडेच विधानसभेत राज्यातील विविध भागातील २५५ मराठी सरकारी शाळा बंद करण्यात आल्याची माहिती सरकारकडून देण्यात आली आहे. त्यामध्ये नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील सात शाळांचा समावेश आहे. मागील पाच वर्षात पटसंख्येच्या कारणास्तव, विलीनीकरणाच्या नावाखाली तसेच नवीन संच मान्यता नियमावलीच्या अंमलबजावणीमुळे जवळपास १ हजार शाळा बंद झाल्याचा अहवाल आहे. ही केवळ आकडेवारी नसून शिक्षणाच्या हक्कावर झालेला झाला आहे.राज्यभर बंद करण्यात आलेल्या सर्व मराठी सरकारी शाळा पुन्हा सुरू करा, पटसंख्या व विलीनीकरणाच्या नावाखाली शाळा बंद करण्याचा निर्णय तातडीने थांबवा, पहिली ते बारावीपर्यंत सर्व विद्यार्थ्यांसाठी मोफत व सक्तीचे शिक्षण कायद्याद्वारे सुनिश्चित करा, सरकारी शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण आधुनिक व दर्जेदार शिक्षणाची हमी द्या, सरकारी शाळांमधील शिक्षकांची सर्व रिक्त पदे तात्काळ भरा, ग्रामीण, आदिवासी व वंचित भागासाठी विशेष शैक्षणिक पायाभूत सुविधा व अनुदान उपलब्ध करून द्यावे. मराठी राजभाषा गौरव दिनी राज्यभर पहिल्या टप्प्यात निवेदन देण्यात येत आहे. परंतु, परिस्थितीत सकारात्मक बदल न झाल्यास राज्यभर तीव्र व व्यापक लोक आंदोलन उभारण्याचा इशारा या निवेदनातून देण्यात आला निवेदन देतेवेळी जिल्हा सचिव साथी किशोर शिंदे शैलेश कटाने, राजगुरू शिंदे, आशिष रावेकर, राम शिंदे, मिलिंद चवरे, प्रवीण गावनर, शहेनशहा, आदित्य शिंदे उपस्थित होते.

# तळेगाव फाट्यावर दुचाकी-चारचाकीचा अपघात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८तिवसा**

अमरावती ते नागपूर महामार्गावर असलेल्या तळेगाव ठाकूर फाट्यावर आज सकाळी दुचाकी व चारचाकी वाहनात झालेल्या अपघातात दुचाकीस्वार युवक गंभीर जखमी झाला. आकाश तेलंगे (वय २२, रा. दिघी महल्ले) असे जखमी युवकाचे नाव आहे. आकाश हा तिवसाहून आपल्या दुचाकी क्रमांक एमएच २७ एएन ६०७० ने मोझरीकडे जात होता. दरम्यान महामार्गावर असलेल्या तळेगाव ठाकूर फाट्यावरून रस्ता ओलांडत असताना अचानक अमरावतीकडून भरधाव येणाऱ्या वाहनाने दुचाकीला धडक दिली. या अपघातात दुचाकीचालक आकाश तेलंगे हा जखमी झाला. सुदैवाने अपघाताच्या वेळी आकाशच्या डोक्यात हेल्मेट असल्याने गंभीर इजा टळली. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य करत जखमी आकाशला उपचारासाठी तिवसा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.

# अकोल्याचे तीन शेतकरी जगातील सर्वात मोठ्या फुलबाजारात

## ‘ऑक्शन क्लॉक’ पद्धतीद्वारे कोट्यवधींची उलाढालीचा घेतला अनुभव

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अकोला**

युरोप अभ्यास दौऱ्यासाठी निवड झालेल्या महाराष्ट्रातील शेतकरी प्रतिनिधींनी नेदरलँडमधील जगप्रसिद्ध रॉयल फ्लोरा हॉलंड या शाही फुलांच्या लिलाव बाजाराला २५ फेब्रुवारीला भेट देत आधुनिक फुलव्यवसायाची सखोल माहिती घेतली.



या दौऱ्यात अकोला जिल्ह्यातील शिवर येथील महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष प्रमोद मुरुमकार, धाकली गावचे आदर्श पुरस्कारप्राप्त सरपंच महेंद्र गाढवे आणि वनोजा येथील प्रगतिशील शेतकरी सचिन राऊत यांचा समावेश आहे. अकोल्याच्या मातीतून निघालेले हे तीनही शेतकरी जगातील सर्वात मोठ्या फुलांच्या बाजारपेठेत पोहोचले.

भेटीदरम्यान संस्थेतील तज्ज्ञांनी जागतिक स्तरावरील फुलांची लिलाव प्रणाली, प्रत्यक्ष प्रात्यक्षिकासह समजावून सांगितली. विशेषतः ‘ऑक्शन क्लॉक’ पद्धतीद्वारे अवघ्या काही मिनिटात कोट्यवधींची उलाढाल कशी होते, याचा अनुभव शेतकरी प्रतिनिधींनी घेतला. याशिवाय फुलांचे दर्जानुसार वर्गीकरण (ग्रेडिंग), आकर्षक व सुरक्षित पॅकिंग, अत्याधुनिक कोल्ड स्टोरेज व्यवस्था, तसेच शेतकरी ते ग्राहक थेट व पारदर्शक व्यवहार प्रणालीबाबत मार्गदर्शन केले. ज्ञानाची देवाण-घेवाण आणि आधुनिक शेतीकडे वाटचाल हा संदेश घेऊन झालेला हा दौरा प्रेरणादायी ठरला. या अनुभवातून अकोला जिल्ह्यातील फुलशेतीला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. जागतिक स्तरावर फुलांचे मार्केटिंग कसे करावे आणि ’डच’ तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन कसे वाढवावे, याचे धडे गिरवण्यासाठी अकोल्यातील तीन तरुण शेतकऱ्यांनी जगातील सर्वात मोठ्या फुलबाजाराला भेट दिली. पारंपारिक शेतीला आधुनिकतेची जोड देणारा हा एक यशस्वी प्रयोग ठरला आहे. आणि रॉयल फ्लोरा हॉलंड या शाही फुलांच्या लिलाव बाजाराला २५ फेब्रुवारीला भेट देत आधुनिक फुलव्यवसायाची सखोल माहिती घेतली. यामुळे त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला जातोय.तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, शिस्तबद्ध नियोजन जागतिक निर्यातीची सुसूत्र साखळी, सहकार तत्त्वावर उभी असलेली संघटनात्मक रचना ही या व्यवस्थेची ताकद असल्याचे स्पष्ट करण्यात आले. आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, शिस्तबद्ध नियोजन, शेतकरी हिताला केंद्रस्थानी ठेवणारी कार्यपद्धती पाहून प्रतिनिधींना नवा दृष्टिकोन लाभला.

# अचलपूर ऑक्सिजन पार्कमध्ये अवैध वृक्षतोड; महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांना नगरपालिकेचा ‘शो-कॉज’

## ३० झाडांच्या फांद्या परवानगीशिवाय छाटल्याचा आरोप महाराष्ट्र झाड संरक्षण अधिनियमांतर्गत कारवाईची नोटीस

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अचलपूर**




शहरातील बिच्छन नदीच्या काठावर विकसित करण्यात आलेल्या ऑक्सिजन पार्कमधील ३० झाडांच्या अवैध छाटणीप्रकरणी अचलपूर नगरपालिकेने महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांना ‘शो-कॉज’ नोटीस बजावली आहे. महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ च्या कलम २० (क) अन्वये ही कारवाई करण्यात आली आहे.नगरपालिकेचे मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड यांनी दिलेल्या माहितीनुसार, ऑक्सिजन पार्कमधील २४ उंबर आणि ६ पिंपळ अशी एकूण ३० झाडांची खोडापासून वरच्या भागातील फांद्या परवानगी न घेता छाटण्यात आल्याचे निदर्शनास आले. नगरपालिका वृक्ष अधिकाऱ्याची पूर्वपरवानगी न घेता ही छाटणी केल्यामुळे संबंधितांवर कारवाई का करू नये, याबाबत लेखी स्पष्टीकरण सादर करण्याचे आदेश नोटीसमध्ये देण्यात आले आहेत. तसेच भविष्यात कोणतीही झाडे किंवा फांद्या छाटण्यापूर्वी नगरपालिकेची परवानगी घेणे बंधनकारक असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.दरम्यान, महावितरणचे कार्यकारी अभियंता प्रदीप अंधारे यांनी सांगितले की, संबंधित परिसरातून वीजवाहिनी जाते. जोरदार वाऱ्यामुळे झाडांच्या फांद्या विद्युत तारांना स्पर्श करत असल्याने वारंवार वीजपुरवठा खंडित होत होता. नागरिकांना होणारा त्रास टाळण्यासाठी फक्त अडथळा निर्माण करणाऱ्या फांद्यांची छाटणी करण्यात आली. पार्कच्या जागेवर वीजवाहिनी आधीपासून होती का, याची वस्तुस्थिती तपासून पाहू. नियमांचे पालन करूनच उत्तर सादर केले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.ऑक्सिजन पार्क हा शहरातील नागरिकांना मोकळा श्वास घेण्यासाठी आणि निसर्गसंपन्न वातावरणाचा आनंद घेण्यासाठी विकसित करण्यात आला आहे. या प्रकल्पावर लाखो रुपयांचा खर्च करण्यात आला असून विविध प्रजातींची शेकडो झाडे येथे लावण्यात आली आहेत. सिमेंटच्या जंगलात राहणाऱ्या नागरिकांना काही क्षण निसर्गाच्या सानिध्यात घालवता यावेत, हा या उपक्रमामागील उद्देश होता.या प्रकरणी पर्यावरणप्रेमी संघटनेचे योगेश खानझोडे यांनी तक्रार दाखल केली आहे. अवैध वृक्षतोडीच्या घटनेमुळे पर्यावरणप्रेमींमध्ये संताप व्यक्त होत असून प्रशासनाने कडक कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. आता महावितरणकडून सादर होणाऱ्या स्पष्टीकरणानंतर पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पालवाडी येथे हरभरा पिकांची गंजी जाळली

## शेतकऱ्यांचे ७० हजार रुपयांचे नुकसान



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८तिवसा**

तिवसा शेतकरी आधीच अनेक संकटांना सामोरे जात आहे. शेतीत पिके होत नाही. त्यामुळे तो हवालदिल झाला असताना तालुक्यातील पालवाडी येथील अल्पभूधारक शेतकऱ्याने शेतात सोगून ठेवलेल्या हरभऱ्याची गंजी अज्ञात माथेफिरूने पेटवून दिली. या घटनेत संपूर्ण गंजी खाक होऊन शेतकऱ्याचे अंदाजे ७० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.येथील पालवाडी अल्पभूधारक शेतकरी सुरेंद्र भागवत आसकर यांचे २ एकरशेत आहे. या शेतालगतच त्यांची वहिनी ललिता रवींद्र आसकर यांचे अडीच एकर शेती आहे दोन्ही शेतात चणा पीक होते सुरेंद्र भागवत आसकर व त्यांच्या वहिनीने हरभऱ्याची २५ गुरुवार रोजी सोंगणी करून शेताच्या मधोमध गंजी लावली होती. शुक्रवार रोजी पहाटे चार ते पाच वाजताच्या दरम्यान अज्ञात समाजकंटकाने त्यांच्या शेतातील गंजीला आग लावली. या आगीत संपूर्ण हरभरा पीक जळून खाक झाले. या घटनेत दोघांचेही अंदाजे ७० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

# धारणमहू परिसरातील रस्ते कामावर नागरिकांचा संताप; गोल दगडांमुळे अपघातांचा धोका

## मुरूमऐवजी दगडांचा वापर; देखरेखीअभावी काम निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८धारणी**

तालुक्यातील धारणमहू परिसरात सुरू असलेल्या रस्ते बांधकामाच्या कामावर स्थानिक नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. रस्त्याच्या पायासाठी आवश्यक असलेला मुरूम न वापरता ठिकठिकाणी गोल दगड टाकण्यात येत असल्याने वाहनांचे संतुलन बिघडून अपघात होण्याचा धोका वाढल्याची तक्रार रहिवाशांनी केली आहे.नवीन रस्त्याचा पाया मजबूत करण्याऐवजी गोलाकार दगडांचा वापर करण्यात आल्याने विशेषतः दुचाकीस्वारांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. चारचाकी वाहनांनाही या मार्गावरून जाताना घसरण्याचा अनुभव येत असल्याचे नागरिकांनी सांगितले. काही ठिकाणी वाहने घसरल्याच्या घटना प्रत्यक्ष घडल्याचे उदाहरण देत प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे त्यांनी नमूद केले.सदर कामाच्या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाचा (सा. बां. विभाग) कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी उपस्थित नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे. अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीत कंत्राटदाराने मनमानी पद्धतीने आणि योग्य तांत्रिक देखरेखीशिवाय काम सुरू ठेवल्याची चर्चा स्थानिक पातळीवर रंगली आहे. परिणामी कामाच्या गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.धारणमहू परिसरातील हा मार्ग गावकऱ्यांसह शालेय विद्यार्थी, शेतकरी आणि प्रवासी मोठ्या प्रमाणावर वापरतात.



त्यामुळे रस्त्याच्या निकृष्ट कामामुळे अपघातांचा धोका वाढल्यास गंभीर परिणाम होऊ शकतात, अशी भीती व्यक्त केली जात आहे.स्थानिक नागरिकांनी संबंधित विभागाने तात्काळ स्थळाची पाहणी करून कामाची तपासणी करावी, अशी मागणी केली आहे. योग्य दर्जाचे साहित्य वापरून रस्त्याचा पाया मजबूत करावा आणि काम दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावे, अशीही मागणी करण्यात आली आहे. वाढत्या अपघातांचा धोका लक्षात घेता त्वरित उपाययोजना करून नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.दरम्यान, या प्रकरणी संबंधित विभागाकडून अधिकृत भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नसून प्रशासन काय पावले उचलते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# तलाठ्याला मारहाण; तिघांना १ वर्षाचा सश्रम कारावास; जिल्हा व सत्र न्यायालयाचा निकाल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**

तलाठ्याकडे ७/१२ मागण्यासाठी गेलेल्या तीन आरोपींनी तहसील कार्यालयात धुडगूस घालून तलाठ्याला मारहाण केल्याप्रकरणी जिल्हा व सत्र न्यायालयाने तीन आरोपींना १ वर्षाचा सश्रम कारावास व दंडाची शिक्षा सुनावली आहे. ही घटना १३ ऑगस्ट २०२० मध्ये सायंकाळी ४३० वाजता नांदगाव खंडेश्वर तहसीलमध्ये घडली होती.१३ ऑगस्ट २०२० रोजी तलाठी सचिन फुटाणे हे त्यांच्या तहसीलमधील तलाठी कार्यालयात कामकाज करीत असताना आरोपी नीलेश प्रकाश गाढेकर (४३), हरिदास भाऊराव तुपट (४३) व रणजित दिलीप वैद्य (३०) सर्व रा. फुब्रगाव ता. नांदगाव खंडेश्वर हे तेथे आले, व ७/१२ मागू लागले. तेव्हां तलाठी सचिन फुटाणे यांनीत्यांना म्हटले की, थोडे थांबा. उत्पन्नाच्या दाखल्याचे फार्म निट लावल्यावर तुम्हाला ७/१२ देतो, असे म्हणताच तिन्ही आरोपींनी तलाठी फुटाणे यांना शिवीगाळ सुरू केली, तसेच जिवे मारण्याची धमकी सुध्दा दिली. एवढेच नव्हे तर, कोरोनामुळे बंद असलेल्या लाथासुध्दा मारल्या व आत दरवाजावर त्यांनी बाहेरून शिरून तलाठी फुटाणे यांच्या हातातील कागदपत्रांची फेकफाक करून त्यांनी बाहेर आणून मारहाण केलीया घटनेची तक्रार फुटाणेयांनी नांदगाव खंडेश्वर पोलिसांत दाखल केली असता पोलिसांनी तिन्ही आरोपीविरुध्द भा. द. वि. च्या कलम ३५३, २३२, २९४, १८६, ३४ अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला तपासी अधिकाऱ्यांनी तपासाअंती आरोपीच्या विरुध्द पुरेसा पुरावा आढळून आल्यामुळे त्यांच्याविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. या प्रकरणात ॲड. प्रफुल्ल तापडिया यांनी साक्षीदार तपासून पुराव्यानिशी आरोप सिध्द केला त्यामुळे जिल्हा व सत्र न्यायाधीश अश्वघोष रामटेके यांनी तिन्ही आरोपीना ६ महिने सश्रम रुपये दंड दंड न भरल्यास कारावास व प्रत्येकी १ हजार आणखी १ महिना शिक्षा, कलम २३२ अंतर्गत तिन्ही आनेपींना १ महिन्यांचा साधा कारावास अशी रुपये दंड, दंड न भरल्यास २ वर्ष सश्रम कारावास व २ हजार शिक्षा सुनावली. फिर्यादीच्या तसेच सहा. सरकारी अभियोक्ता बाजूने ॲड. प्रफुल्ल तापडिया यानी युक्तीवाद केला. कोर्ट पैरवी म्हणून पो. कॉ. ईश्वर राठोड व हे. कॉ. अमरदिप वासनकर व अरुण हटवार यांनी काम पाहिले.

# खारघर येथे हिंद-दी-चादर गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहीदी समागमाचा भव्य सोहळा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८नवी मुंबई**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने दिनांक १ मार्च २०२६ रोजी नवी मुंबईतील खारघर, सेक्टर २९ येथील ओवे मैदानावर शीख पंथाचे नववे गुरु व हिंद-दी-चादर म्हणून गौरविले जाणारे गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहीदी समागमाचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या ऐतिहासिक सोहळ्यास देशभरातून शीख बांधव आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.या कार्यक्रमाला देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी ऑनलाईन माध्यमातून संबोधित करणार असून केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री गिरीष महाजन तसेच भाजपा नेत्या नवनीत राणा यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.कार्यक्रमात गुरुबाणी कीर्तन, अरदास तसेच गुरु तेग बहादूर यांच्या जीवनकार्यावर आधारित विशेष सादरीकरण होणार आहे. धर्मस्वातंत्र्यासाठी दिलेल्या त्यांच्या सर्वोच्च बलिदानाचे स्मरण करून शौर्य, त्याग आणि मानवतेच्या मूल्यांचा गौरव केला जाणार आहे.या पार्श्वभूमीवर ओवे मैदान परिसरात व्यापक तयारी सुरू असून कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात येत आहे. प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि स्वयंसेवक कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सज्ज झाले आहेत..

# काँग्रेसमधील अंतर्गत गटबाजी नडली! अमरावतीच्या राजकारणात भूकंप, बडा मोहरा भाजपाच्या गळाला

## दर्यापूर विधानसभा मतदारसंघात काँग्रेसला मोठा धक्का

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८दर्यापूर**

अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर विधानसभा मतदारसंघात काँग्रेसला मोठा धक्का बसलाय. ज्येष्ठ नेते बाळासाहेब हिंगणीकर यांनी अखेर भाजपमध्ये जाण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून त्यांच्या पक्षप्रवेशाबाबत सुरू असलेल्या चर्चांना आता पूर्णविराम मिळाला आहे. काँग्रेसमधील स्थानिक गटबाजी आणि दुर्लक्षामुळे नाराज असलेल्या हिंगणीकर यांनी पुन्हा एकदा हिंदुत्वाच्या विचाराने प्रेरित होऊन भाजपची वाट धरली आहे. त्यांच्या या निर्णयामुळे दर्यापूरच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून काँग्रेससाठी हा एक मोठा राजकीय तोटा मानला जात आहे.



बाळासाहेब उर्फ शंकर विश्वनाथ गावंडे (हिंगणीकर) यांची राजकीय कारकीर्द शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांनी सुरू झाली होती. शिवसेनेत असताना त्यांनी जिल्हाप्रमुख या अत्यंत महत्त्वाच्या पद सांभाळली.

त्यानंतर काही वर्षांपूर्वी त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आणि पिंपळोद सर्कलचे जिल्हा परिषदेत प्रतिनिधित्व केले. जिल्हा परिषदेचे वित्त आणि आरोग्य सभापती म्हणूनही त्यांनी काम केले आहे. मुळचे शिवसैनिक असलेले बाळासाहेब आता भाजपच्या माध्यमातून पुन्हा एकदा आपल्या जुन्या विचारधारेकडे परतणार आहेत.दर्यापूर नगरपरिषदेच्या निवडणुकीत काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांकडून हिंगणीकर यांना विश्वासात घेतले गेले नाही. सततच्या दुर्लक्षामुळे त्यांची पक्षात मोठी घुसमट होत होती. स्थानिक पातळीवरील वाढती गटबाजी आणि नेत्यांमधील समन्वयाचा अभाव यामुळे हिंगणीकर यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देण्याचे निश्चित केले. आपली राजकीय कोंडी फोडण्यासाठी त्यांनी भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांशी संपर्क वाढवला होता. यामध्ये खासदार डॉ. अनिल बोंडे, माजी खासदार नवनीत राणा आणि माजी राज्यमंत्री प्रवीण पोटे पाटील यांच्यासोबत प्रदीर्घ चर्चा केल्यानंतर त्यांनी कमळ हाती घेण्याचा निर्णय घेतला.

बाळासाहेब हिंगणीकर यांच्या भाजप प्रवेशाचा मुहूर्त आता ठरला आहे. येत्या ७ मार्च रोजी एका विशेष सोहळ्यात ते भाजपमध्ये अधिकृतपणे प्रवेश करतील. राज्याचे महसूल मंत्री तथा अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडणार आहे.

विशेष म्हणजे केवळ हिंगणीकरच नव्हे, तर त्यांच्यासोबत त्यांचे ४० पेक्षा अधिक दिग्गज पदाधिकारी आणि कार्यकर्ते देखील भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. या मोठ्या बदलामुळे दर्यापूरमधील भाजपची ताकद वाढणार असून आगामी निवडणुकांमध्ये याचे पडसाद उमटण्याची शक्यता आहे.

# अमरावती रेल्वे उड्डाणपुलासाठी १२५.३७ कोटींची मागणी; अर्थसंकल्पात तरतुदीचे संकेत

## आ. सुलभाताई खोडके यांचा पाठपुरावा; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सकारात्मक प्रतिसाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८मुंबई**

अमरावती शहरातील राजकमल चौक ते रेल्वे स्टेशन दरम्यान असलेल्या रेल्वे उड्डाणपुलाच्या पुनर्बांधणीसाठी १२५.३७ कोटी रुपयांच्या निधीची मागणी करण्यात आली असून, येत्या ६ मार्च रोजी सादर होणाऱ्या राज्याच्या अर्थसंकल्पात यासाठी तरतूद करण्यात यावी, अशी विनंती आमदार सुलभाताई संजय खोडके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. मुख्यमंत्र्यांनी या मागणीस सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे कळते.सन १९६३ मध्ये बांधण्यात आलेला हा उड्डाणपूल अमरावती ते बडनेरा रेल्वेमार्गावर



असून, शहराच्या चार प्रमुख भागांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. स्ट्रक्चर ऑडिटमध्ये पूल वाहतुकीसाठी धोकादायक ठरल्याने २५ ऑगस्ट २०२५ पासून सर्व प्रकारची वाहतूक बंद करण्यात आली आहे. गेल्या सहा महिन्यांपासून पर्यायी मार्गांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असून नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.आ. खोडके यांनी हिवाळी अधिवेशनात लक्षवेधीद्वारे हा प्रश्न उपस्थित केला होता. तसेच जानेवारी महिन्यात अमरावती दौऱ्यावर आलेले अजित पवार यांनीही या प्रकल्पासाठी मार्च २०२६ च्या अर्थसंकल्पात निधी देण्याचे आश्वासन दिले होते. सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा प्रस्ताव आता अर्थसंकल्पीय अधिवेशनापर्यंत पोहोचला आहे.नवीन उड्डाणपूल अधिक प्रशस्त व सुरक्षित पद्धतीने उभारण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला असून, निधी उपलब्ध झाल्यास कामाला गती मिळणार आहे. त्यामुळे अमरावतीकरांच्या दीर्घकाळ प्रलंबित रहदारी समस्येवर लवकरच तोडगा निघण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# जिल्ह्यात ५४५ गावांत संभाव्य टंचाई; चिखलदऱ्यातील १५ गावांचा समावेश

## १९ कोटी ७ लाखांचा टंचाई निवारणार्थ आराखडा, ७२२ उपाय योजना प्रस्तावित



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

जिल्ह्यात दरवर्षी उन्हाळा सुरू होताच पाणीटंचाईचा प्रश्न उफाळून येतो. यंदाही जिल्ह्यातील ५४५ गावांमध्ये संभाव्य पाणी टंचाईचा सामना करावा लागणार आहे. त्यामुळे टंचाई निवारणार्थ जिल्हा परिषदेच्या ग्रामिण पाणी पुरवठा विभागाच्या वतीने १९ कोटी ७ लाख ५५ हजार रुपयांचा कृती आराखडा तयार केला आहे.

टंचाई निवारणार्थ ७२२ उपाय योजना प्रस्तावित असून चिखलदरातील १५ गावांना सर्वाधिक झळ असल्याने तेथे टँकरने पाणी पुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यात सध्या ५३७ नळयोजना, १,७७२ हातपंप, ३९९ विद्युत पंप, १,१७० सार्वजनिक व २,०५६ खासगी विहिरींचे अधिग्रहन आदी उपाय योजना सुरू आहेत. तर आगामी टंचाई बघता १४ तालुक्यांमध्ये १४३ खासगी विहिरी अधिग्रहित कराव्या लागणार आहेत. याशिवाय प्रशासनाने जलस्त्रोत अधिग्रहण, नळयोजना दुरुस्ती आणि गरजेनुसार टँकरपुरवठा अशा उपाय योजनांचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार १४३ विहिरी अधिग्रहित करण्यात येणार असून २८६ ठिकाणी नळयोजनांची दुरुस्ती प्रस्तावित आहे. सर्वाधिक बाधित तालुक्यांमध्ये चिखलदरा तालुक्यात ८३ व धारणी तालुक्यात ७५ गावांचा समावेश आहे. याकरिता आता ७२२ योजना प्रस्तावित करण्यात आल्या असून जिल्हा प्रशासनाने टंचाई निवारणार्थ १९ कोटी ७ लाख ५५ हजारांच्या खर्चाला मान्यता दिली आहे. त्यामुळे टंचाई निवारणार्थ आता ह्या उपाय योजना राबविण्याकरिता प्रशासन सज्ज झाले आहे.

चिखलदर तालुक्यातील १५ गावांमध्ये टँकरने पाणी पुरवठा चिखलदरा तालुक्यात दरवर्षीच पाणी टंचाईची झळ अधिक प्रमाणात दिसून येते. यंदा देखील तालुक्यात १५ गावांत टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागार आहे. तसेच नियोजन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# अमरावती मनपाच्या विशेष सभेत कचरा प्रश्नावर खडाजंगी

## अनिल अग्रवाल यांनी केला प्रश्नांचा भडिमार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

अमरावती शहरातील वाढत्या कचरा समस्येवर चर्चा करण्यासाठी बोलावण्यात आलेल्या अमरावती महानगर पालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेत आज जोरदार खडाजंगी झाली. कचरा संकलन, विलंबित उचल, ठेकेदारांची कार्यपद्धती आणि स्वच्छतेच्या नियोजनावरून प्रशासन,सत्ताधारी व विरोधक आमनेसामने आले.आजच्या आमसभेत सर्वाधिक प्रश्नांचा भडिमार अनिल अग्रवाल यांनी प्रशासनाला धारेवर धरत प्रश्नांचा भडिमार केला.



विरोधी पक्षाने कचरा व्यवस्थापनातील अपयशाबद्दल महापौर आणि प्रशासनावर निशाणा साधला. शहरातील अनेक भागांत कचऱ्याचे ढीग साचत असल्याने नागरिक त्रस्त आहेत. नियमित उचल होत नसल्याने दुर्गंधी, डासांची वाढ आणि आरोग्याच्या तक्रारी वाढत असल्याचे विरोधकांनी सभागृहात मांडले. कंत्राटी पद्धतीतील त्रुटी, मनुष्यबळाची कमतरता आणि देखरेखीअभावी परिस्थिती बिघडल्याचा आरोप नगरसेवकांनी केलामहापौरांनी प्रशासनाच्या वतीने स्पष्टीकरण देताना कचरा व्यवस्थापन सुधारण्यासाठी नव्या योजनेची अंमलबजावणी सुरू असल्याचे सांगितले. अतिरिक्त गाड्या, यांत्रिक साधने आणि नियंत्रण कक्षाच्या माध्यमातून समस्या सोडविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच सभागृहातील शिस्त राखण्याचे आवाहन करत नियमांचे पालन करण्याची गरज अधोरेखित केली.सभागृहात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते; मात्र नंतर चर्चा पुन्हा सुरू करण्यात आली. कचरा प्रश्नावर ठोस निर्णय व कृती आराखडा जाहीर करण्याची मागणी सर्वपक्षीय सदस्यांकडून करण्यात आली. अनेक सदस्यांनी कोणार्क कंपनीचा ठेका रद्द करण्याची मागणी यावेळी केली.

# ६ मार्चला होणार स्थायी समिती सभापतींची निवड

## भाजपचे बांबल, राकाँचे मार्डीकर यांची नावे चर्चेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

स्थायी समितीच्या १६ सदस्यांची निवड झाल्यानंतर आता सभापतीची निवड येत्या शुक्रवार ६ मार्च रोजी क रण्यात येणार आहे. स्थायी समितीचे १६ सदस्य असून यामधून सभापती निवडल्या जाणार आहे. जर हे पद भाजपकडे गेले तर मिलिंद बांबल, किंवा राकाँकडे गेल्यास अविनाश मार्डीकर यांची नावे सध्या चर्चेत आहेत.





स्थायी समितीमध्ये सत्ताधारी भाजप ५, युवा स्वाभिमानी-३, राकाँ-२ शिंदे-बीएसपी-उबाठा-१ असे एकूण ११ सदस्य आहेत. तर विरोधी पक्ष काँग्रेस-३, एमआयएम-२ असे पाच सदस्य आहेत. यामध्ये सत्ताधारी महायुतीच्या वाटाघाटीनुसार भाजपाचा जर सभापती ठरविला तर पाच सदस्यांपैकी तिसऱ्यांदा नगरसेवक झालेले अनुभवीव माजी सभापती मिलिंदबांबल यांचे नाव समोर येवू शकते. जर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडे सभापती पद गेल्यास स्थायी समितीचे तीन वेळा सभापती राहिलेले अनुभवी अविनाश मार्डीकर यांची वर्णी लागू शकते.

भाजपच्या पाच सदस्यांमध्ये मिलिंद बांबल, पद्मजा कौंडण्य, पंचकुला चव्हाण, स्मीता सूर्यवंशी, विनोद तानवैस यांचा समावेश आहे. तर युवा स्वाभिमानीचे प्रा. प्रशांत वानखडे, प्रियंका पाटणे, दीपक साहू हे तीन सदस्य आहे. राकाँ अजित पवार गटाच्या दोन सदस्यांमध्ये अविनाश मार्डीकर वमिनल सवई आहेत. शिंदे गट-बीएसपी-उबाठा या गटाच्या मंजुषा जाधव यांचा समावेश आहे.विरोधी पक्ष काँग्रेसचे ३ सदस्य असून यामध्ये ललितारतावा, प्रशांत महल्ले, असमा फिरोज खान तर एमआयएमचे सलाहुद्दीन इकरामोद्दीन, नजीब खान करीम खान यांचा समावेश आहे. हे १६ सदस्य स्थायी समिती सभापतीची निवड करणार आहे. त्यामुळे मनपाच्या तिजोरीची मास्टर चाबी तब्बल चार वर्षाच्या प्रशासकीय राजवटीनंतर कुणाच्या हातात जाते, याकडे सर्वाच्या नजरा लागल्या आहे. उल्लेखनीय असे की, ८ मार्च २०२२ रोजी तिसावे स्थायी समिती सभापती म्हणून भाजपचे सचिन रासने यांचा कार्यकाळ संपला होता.

**अशी होणार निवडणूक प्रक्रिया**

६ मार्चला सकाळी ९ ते १०.३० वा. पर्यंत नामांकन उचल आणि भरण्या मुदत आहे. त्यानंतर ११ वाजता स्वर्गीय सुदाम काका देशमुख सभागृहात पिठासीन अधिकारी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्यासह आयुक्त सौम्या शर्मा यांच्या उपस्थितीत स्थायी समितीच्या सभापतीची निवडणूक होणार आहे.

# घरफोडी करणारे अट्टल गुन्हेगार परतवाडा पोलिसांच्या जाळ्यात१.३० लाखांचा मुद्देमाल जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९परतवाडा**

घरफोडी व मोटारसायकल चोरी प्रकरणी दोन सराईत गुन्हेगारांना अटक करून परतवाडा पोलिसांनी दोन घरफोडी आणि एक दुचाकी चोरीचा गुन्हा उघडकीस आणला आहे. आरोपींकडून एकूण १ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.फिर्यादी सचिन अशोकराव मनोहरे (रा. पांडुरंग नगर, परतवाडा, ता. अचलपूर, जि. अमरावती) यांनी तक्रार दिली की, ते २१ फेब्रुवारी रोजी कामानिमित्त बाहेरगावी गेले असता अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून कपाटातील सोने-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा सुमारे ८५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. या तक्रारीवरून पोलीस स्टेशन परतवाडा येथे अप. क्र. ११४/



२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३३१(३), ३३१(४), ३०५(अ) अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला.सपोनि. सलीम शेख यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकाने तपास सुरू केला. गोपनीय माहितीच्या आधारे कांडली, परतवाडा येथील मुन्ना ऊर्फ संजय नंदु कवडे व शेखर अनिल उईक (दोघेही रा. जुनी वस्ती, कांडली) यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्यांनी अल्पवयीन साथीदाराच्या मदतीने पांडुरंग नगर येथे चोरी केल्याची कबुली दिली. तसेच व्यंकटेश नगर येथील सपना सनी उनोने यांच्या घरातील चोरीची कबुलीही दिली.चोरीसाठी वापरलेली मोटारसायकल रहीमापुर हद्दीतून चोरीस गेल्याचे उघड झाले असून त्या प्रकरणी पोलीस स्टेशन रहीमापुर येथे अप. क्र. १४/ २०२६ कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंद आहे. आरोपींकडून सोन्या-चांदीचे दागिने, एक आयफोन व मोटारसायकल असा एकूण १.३० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.ही कारवाई पोलीस अधीक्षक ग्रामीण विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत व सहायक पोलीस अधीक्षक शुभम कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार सुरेश म्हस्के व पथकाने केली.

# जळगाव आर्वीत उद्या दिंडी महोत्सव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८धामणगाव रेल्वे**

जळगाव आर्वी येथे मागील सात दिवसांपासून सुरू असलेल्या संत लहरीबाबा पुण्यतिथी महोत्सवाचा समारोप उद्या शनिवारी दिंडी महोत्सवाने होणार असून विदर्भातील तब्बल ८० दिंड्या या भव्य रथयात्रेत सहभागी होणार आहेत. संपूर्ण गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.संत लहरीबाबांचा जन्म अकोला जिल्ह्यातील श्रीक्षेत्र मधापुरी येथे सन १९३२ मध्ये शिवरामजी व आई झिबाबाई दहीकर यांच्या उदरी झाला. त्यांचे बालनाव भिमराव होते. लहानपणापासूनच अध्यात्माची ओढ असलेल्या या अवलिया संताने विदर्भभर फिरून आध्यात्मिक विचारांचा प्रसार केला. धामणगाव देव येथील संत मुंगसाजी महाराजांनी त्यांना माझा मुगंशा अशी ओळख दिली. त्यांच्या आत्मनंदलहरी स्वभावामुळे त्यांना ‘लहरीबाबा’ हे नाव लाभले.जळगाव आर्वी येथे सुमारे ४४ वर्षांपूर्वी आगमन झाल्यानंतर त्यांनी मारोती मंदिराजवळ बसून ग्रामस्थांना अध्यात्माचे धडे दिले. दुष्काळाच्या कठीण काळात त्यांनी ग्रामस्थांना धैर्य दिले. ज्या ठिकाणी ते विराजमान झाले, त्या ठिकाणी विहिरीला पाणी लागल्याची घटना भाविकांसाठी चमत्कार ठरली. त्यानंतर येथे भव्य मंदिर उभारण्यात आले. मंदिरात लहरीबाबांची भव्य मूर्ती असून पांडुरंग, दुर्गा, दत्तात्रय, राम, राधा, कृष्ण, गणपती तसेच संत गजानन महाराज आणि साईबाबा यांच्या मूर्ती विराजमान आहेत.महोत्सवानिमित्त भागवताचार्य पूर्णाताई कुलकर्णी यांच्या भागवत कथेला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. उद्या पहाटे ग्रामस्वच्छता, सकाळी होमपूजा, दुपारी महाप्रसाद तर सायंकाळी पाच वाजता संत आगमन प्रार्थना होणार आहे. रात्री सात वाजता संत लहरीबाबांची प्रतिमा असलेली रथयात्रा गावातून मार्गक्रमण करेल.

# उद्या पासून मेळघाटात २५० किमी पदयात्रेला होणार सुरुवात

## शेतकरी-आदिवासी हक्कांसाठी बच्चू कडूंचा एल्गार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

मेळघाटातील शेतकरी, आदिवासी व मजूर वर्गाच्या प्रलंबित प्रश्नांसाठी माजी आमदार बच्चू कडू यांनी उद्यापासून २५० किलोमीटरच्या पदयात्रेला प्रारंभ केला. १ ते ९ मार्चदरम्यान ही पदयात्रा पार पडणार असून ९ मार्च रोजी चिखलदरा येथे महाअंतिम सभेने यात्रेची सांगता होईल.मेळघाटातील दुर्गम भागात प्रत्यक्ष जाऊन ग्रामसभा, नागरिक संवाद व समस्यांची नोंद घेण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. शेतकरी कर्जमाफी, मनरेगा



अंतर्गत प्रलंबित कामे, मजुरांचे थेट व वेळेत वेतन, तसेच कंत्राटी भरती थांबवण्याची मागणी पदयात्रेतून करण्यात येत आहे. दुष्काळ व नापिकीच्या पार्श्वभूमीवर अतिरिक्त कर्जमाफी जाहीर करावी, अशीही भूमिका मांडण्यात आली.मानव-वन्यप्राणी संघर्षावर स्वतंत्र राज्य धोरण, जलद प्रतिसाद पथक व वाढीव नुकसानभरपाईची तरतूद करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच वीज, पाणी, रस्ते, सुरक्षित वाहतूक, जलजीवन मिशनची चौकशी, शिक्षक व डॉक्टरांच्या रिक्त पदांची भरती, धारणी येथे स्त्री रुणालय आणि दुर्गम भागासाठी एअर अँब्युलन्स सुविधा सुरू करण्याची मागणीही करण्यात आली.ही पदयात्रा राजकारणासाठी नव्हे, तर जनतेच्या जगण्याच्या प्रश्नांसाठी आहे. शासनाने तातडीने निर्णय घ्यावेत, असा इशारा बच्चू कडू यांनी दिला. ९ मार्चच्या सभेला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत